साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
। थर्मल । स्वेटर्स । जर्किन
। ग्लोज । सॉक्स । स्कार्फ
। कॅप्स् एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, अ.नगर.
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०१.१०.२०२६ | अंक नं. १५५ | वर्ष ६१ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

उत्सव मजुरीचा, डबल फायद्याचा..
{ ₹999/- दागिन्यांच्या प्रतीग्रॅम मजुरीवर }
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना तेवढी टक्के मजुरीत सूट
ऑफर 14 सप्टेंबर 2026 ते 8 ऑक्टोबर 2026 पर्यंतच वैध
उदा.
दागिन्यांचे वजन 1 ग्रॅम ते 10 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 10% लागणारी प्रतीग्रॅम मजुरी 899/-*
दागिन्यांचे वजन 50 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 50% लागणारी प्रतीग्रॅम मजुरी 499/-*
दागिन्यांचे वजन 100 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 100% मजुरीच नाही*
योजनेचे नियम : 1) सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू. 2) एका वेळेस एकाच योजनेचा लाभ घेता येईल.
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु


## चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणारे जोशी महाराज

पत्रिका पाहून तर कोणीही भविष्य सांगू शकतो. परंतु, चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणे ही एक मोठी विद्या आहे. आपले भविष्य कोणत्या क्षेत्रामध्ये कसे आहे, हेसुद्धा सांगितले जाते.



जसे कर्म तसे फळ, हे शाश्वत सत्य आहे. पण, बऱ्याचवेळा अहोरात्र प्रयत्न करूनही मोठे यश मिळत नाही, हा केवळ देवयोग मानणे, हा श्रद्धेचा भाग आहे. परंतु, भविष्यात काय घडणार आहे, हे तुमच्या वास्तू व चेहऱ्यावर लिहिलेले असते, असे प्रतिपादन बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील जोशी यांनी केले आहे. अनेक काळापासून चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगण्याचे ते कार्य करीत आहेत. जागा, जमीन, शेती, व्यवसाय, लग्न, संतती, वास्तुशास्त्राचे भाकीत ते त्या त्या घरातील कुटुंबप्रमुखाचा चेहरा पाहून करतात.

भविष्य सांगण्याचे अनेक प्रकार आहेत. पंचांगशास्त्राला आधार आहे. पण, चेहऱ्यावरून जे भविष्य सांगितले जाते, ते ज्योतिषशास्त्रावर अवलंबून असते. माणसाच्या चेहऱ्यापासून राग, आनंद, दोष आणि प्रेम, हे सर्व भाव कळतात, त्या अनुषंगाने भविष्य सांगतात.

जोशी हे चेहरा व वास्तू पाहून अचूक भविष्य वर्तविणाऱ्या भविष्यकारांपैकी एक आहेत. आत्तापर्यंत त्यांनी देशभरातील अनेक दिग्गज नेत्यांबाबत वर्तविलेले भविष्य खरे ठरले आहे. फिल्मलाइन, राजकीय, सामाजिक, मराठी-हिंदी अभिनेते, उद्योजक आणि बिझनेसमन, बिल्डर, रियल इस्टेट, शैक्षणिक क्षेत्रातील अनेकांचे भविष्य वर्तविले आहे. घर, ऑफिस, हॉस्पिटल, कारखाना, हॉटेल यांसारख्या जागा; मग मालकीच्या किंवा भाडेतत्वावर असल्या तरी भविष्य सांगतात व इ. दोष टाळण्यासाठी उपासनाही सांगतात, इतकेच नव्हे तर स्त्री-पुरुषांच्या सर्व समस्यांचे निवारण सांगतात. कोणत्याही प्रकारच्या कठीण वा अतिकठीण अडी-अडचणींवर मार्ग काढतात.

आत्तापर्यंत जोशी महाराजांनी वर्तविलेले भविष्य खरे ठरतेच, असा त्यांचा दावा आहे.

ता. आष्टी, जि. बीड । संपर्क : 9006239009, 9075174343


## 'एसआयआर' प्रकियेमध्ये सुनावण्यांना स्थगिती; आता होणार केवळ पडताळणी : निवडणूक आयोग

नगर - केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची (एसआयआर) प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नवीन मतदार नोंदणीसाठीच्या फॉर्म ६ मधील अतिरिक्त स्वयंघोषणापत्राचा रकाना हटविण्यात आला आहे. नवीन निर्देशांनुसार अहिल्यानगर शहरातील सैनिक लॉन येथे सुरू असलेल्या सुनावण्या स्थगित करण्यात आल्या आहेत. आता सुनावण्यांऐवजी केवळ पडताळणी करून आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

अहिल्यानगर शहरातील ४४ हजार ७४ मतदारांना यापूर्वी सुनावणीच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. आता या मतदारांसाठी सुनावणीऐवजी केवळ पडताळणीची प्रक्रिया सुरू ठेवण्यात आली आहे. संबंधित मतदारांकडून आवश्यक कागदपत्रे घेऊन ती बीएलओ ॲपवर अपलोड केली जात आहेत. त्यामुळे मतदारांना कार्यालयात जाऊन सुनावणीसाठी उपस्थित राहण्याची आवश्यकता राहिलेली नाही.

दररोज १८ बीएलओ पडताळणीचे काम करीत आहेत. नवीन निर्देशांनुसार, ज्या मतदारांची पडताळणी करणे आवश्यक आहे, त्यांच्या घरी जाऊन बीएलओंकडून थेट पडताळणी केली जाणार आहे. ही प्रक्रिया १० नोव्हेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

त्यानंतर १४ नोव्हेंबरला प्रारूप मतदार यादी, तर १६ नोव्हेंबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

### नवमतदारांसाठी मॅपिंगची कटकट संपली

नवीन मतदार नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या ऑनलाइन फॉर्म ६ मधून अतिरिक्त घोषणापत्राचा भाग काढून टाकण्यात आला आहे. यापूर्वी नवमतदारांना स्वतःचे किंवा आई-वडील अथवा आजी-आजोबांचे नाव मागील एसआयआर मतदार यादीत होते की नाही, याची माहिती देणे आणि त्यासंबंधी पुरावे सादर करणे बंधनकारक होते. आता ही अट शिथिल करण्यात आली आहे. ज्या राज्यांमध्ये विशेष सखोल पुनरीक्षणाची (एसआयआर) मोहीम पूर्ण झाली आहे, तेथील पात्र नवमतदारांना आता सामान्य प्रक्रियेनुसार मतदार यादीत नाव नोंदविता येणार आहे.

### सुनावणीऐवजी घरोघरी पडताळणी

मतदार यादीच्या पडताळणीदरम्यान नावांमध्ये तफावत आढळल्यामुळे नोटिसा मिळालेल्या मतदारांना आता निवडणूक कार्यालयात सुनावणीसाठी जाण्याची गरज नाही. बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) संबंधित मतदारांच्या घरी जाऊन आवश्यक कागदपत्रे घेतील आणि त्यांची पडताळणी करतील. दरम्यान, एसआयआर प्रक्रियेदरम्यान पात्र असूनही ज्या मतदारांची नावे वगळली गेली आहेत किंवा नोंदणीपासून राहून गेली आहेत, अशा नागरिकांसाठी मतदार नोंदणी अधिकारी विशेष नोंदणी मोहीम राबविणार आहेत.

### दावे-हरकतींसाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदत

महाराष्ट्रात मतदार यादीसंदर्भातील दावे व हरकती सादर करण्याची मुदत १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी ही मुदत ३० सप्टेंबर २०२६ होती. अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष । महिला । मुलांसाठी
आजच भेट द्या !
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.
शू पॅलेस
SHOE PALACE
9881531536

यंदाच्या दिवाळीला व नवीन वर्षाला कुठे आहात तुम्ही ?
सिंगा-मले-थाय-दुबई-अबुधाबी-केरळ-अंदामान
शिमला-मनाली की वाराणसी, अयोध्या येथे
चलो बॅग भरो निकल पडो..

| | | |
|---|---|---|
| सिंगापुर मलेशिया थायलंड 1,92,000/- १० दिवस | वाराणसी अलाहबाद 58,000/- ८ दिवस | बेस्ट ऑफ अंदमान 74,000/- ६ दिवस |
| हनिमून शिमला मनाली 52,000/- ७ दिवस | नैनिताल मसुरी कॉर्बेट 64,000/- ९ दिवस | दुबई अबुधाबी 88,919/- ५ दिवस |
| राजस्थान मेवाड 53,000/- ८ दिवस | सिक्कीम दार्जिलिंग 80,000/- ९ दिवस | केरळ 35,000/- ६ दिवस |
| बेस्ट ऑफ कश्मिर 56,000/- ६ दिवस | फुकेत क्राबी 96,000/- ४ दिवस | हायलाईटस् ऑफ भुतान 82,000/- ७ दिवस |

राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
98500 63432, 9112384842

## 'एसआयआर'च्या सुनावणीत अधिकाऱ्यांकडून 'मनमानी'

### टोलवाटोलवीमुळे ज्येष्ठ नागरिकांची होतेयं हेळसांड

नगर - अंधेर नगरी, चौपट राजा या म्हणीप्रमाणे निवडणूक अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे एसआयआरच्या सध्या सुरु असलेल्या सुनावणीत ज्येष्ठ नागरिकांची हेळसांड होत आहे. तसेच २००२ साली मयत झालेल्या व्यक्तींच्या नावाने नोटीस बजावण्यात आली असून, जीवंत मतदारांची नावे मतदार यादीतून गायब करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ओळखीच्या लोकांची कामे तातडीने केली जात असून, ज्येष्ठांना या टेबलवरुन त्या टेबलवर आणि त्या टेबलवर पुढच्या टेबलवर ढकलले जात आहे. त्यामुळे ज्येष्ठांना या एसआयआरचा मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे ज्येष्ठ नागरिकांचे म्हणणे आहे.

याबाबत प्रकाश बाबुलाल जोशी यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, सामान्य नागरिक असलेले प्रकाश बाबुलाल जोशी यांनी आतापर्यंत १० टर्म निवडणुकीत मतदान केले आहे. शासनाच्या नवीन नियमावलीनुसार २००२ मध्ये मतदार यादीत नाव न सापडल्याने त्यांना व त्यांच्या कुटुंबाला नोटीस बजावण्यात आली होती. प्रशासनाने सोयीनुसार तीन शिफ्ट केल्या असल्या तरी प्रत्यक्षात यामुळे जनतेची प्रचंड हेळसांड झाली. सकाळी १० वाजल्यापासून दुपारी १ वाजेपर्यंत त्यांना तिकडून तिकडे आणि तिकडून इकडे अशा पद्धतीने फिरवण्यात आले. आपण एक जेष्ठ नागरिक असूनही निवडणूक अधिकाऱ्यांकडून दिलेली वागणूक अत्यंत चीड आणणारी होती. ज्येष्ठ नागरिकांना कोणतेही सहकार्य न करता या टेबलवरुन त्या टेबलवर पाठविले जात होते. याउलट ओळखीच्या लोकांना प्राधान्य देत सामान्य नागरिकांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून आले. सुनावणीसाठी लागलेल्या लांबच लांब रांगा पाहून अनेक नागरिक निघून गेले. मात्र, ओळखीच्या लोकांची तोंडे पाहून त्यांची कामे करण्यात आली, तर वशिला नसलेल्या सामान्य नागरिकांना मात्र पूर्णपणे डावलण्यात आले. तेथे उपस्थित असलेल्या निवडणूक अधिकाऱ्यांना व वार्डातील नगरसेवकांना तक्रार करूनही सर्वांनी या प्रकाराकडे दुर्लक्ष केल्याचे जोशी यांनी म्हटले आहे.

एसआयआरच्या विशेष मोहिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना जोशी यांनी नमूद केले की, २००२ मध्ये स्वर्गवासी झालेल्या व्यक्तींच्या नावाने नोटीसा बजावण्यात आल्या असून, जीवंत मतदारांची नावे मात्र मतदार यादीतून गायब झाली आहेत. निवडणूक अधिकाऱ्यांनी सामान्य जनतेला, ज्येष्ठ नागरिकांना सहकार्य करून ही एसआयआर मोहिम पारदर्शक व सुविधाजनक राबवावी, अशी मागणी प्रकाश जोशी यांनी केली आहे.

महान कार्याला अभिवादन
महान विचारांना वंदन!



अशोकभाऊ फिरोदिया
जन्म दि. २ ऑक्टोबर १९४४ । स्व. दि. २२ ऑक्टोबर २०००
८२ व्या
जन्मजयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !
सर्व विश्वस्त, सल्लागार मंडळ, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी
अहमदनगर एज्युकेशन सोसायटी
अहिल्यानगर

॥ १२ वे पुण्यस्मरण ॥



स्व. सुरेन्द्रकुमार गोपालदास गुजराथी
स्व. दि. २/१०/२०१४
भाग्यवान आम्ही पितृछत्र ऐसे लाभले
आशीर्वादाने आपल्या जीवन धन्य झाले...
अजूनही वाटते तुम्ही सोबत आहात...
पाठीवरुनी हात मायेचा फिरवित आहात...
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली..
दुःखांकित
गुजराथी परिवार
अ.नगर

## कापड बाजारासह सर्व प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमणांची 'मनपा पथका'कडून पाहणी

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने शहरातील कापड बाजार, मोची गल्ली, गंज बाजार आणि घासगल्ली परिसरात पाहणी करून अतिक्रमणांची तपासणी केली. कापड बाजार रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. त्यामुळे या रस्त्यावर कोणी अतिक्रमण केले आहे का, याचीही पथकाने पाहणी केली.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने १ ऑक्टोबर रोजी ही मोहीम राबविली. रस्त्यावर अतिक्रमण करून वाहतुकीला अडथळा निर्माण करू नये, अन्यथा संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, अशा सूचना महापालिकेच्या पथकाने व्यावसायिक व नागरिकांना दिल्या.

शहरातील प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमणांकडे महापालिका पथकाचे विशेष लक्ष राहणार आहे. यापुढे रस्त्यावर अतिक्रमण करताना कोणी आढळून आल्यास थेट कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पथकाने दिला.

दरम्यान या तपासणीत मनपाच्या पथकाला कोठेही अतिक्रमण दिसून आले नाही. काही व्यापाऱ्यांनी आपले साहित्य रस्त्याकडेला ठेवलेले आढळून आले. त्यांना ते साहित्य रस्त्यावरुन उचलण्याच्या सुचना पथकाने केल्या. त्यामुळे १ ऑक्टोबरच्या कारवाईदरम्यान जप्तीची कोणतीही मोहिम राबविण्यात आली नसल्याचे अतिक्रमण विभागाच्या पथकाकडून सांगण्यात आले.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# 'जिल्हा बँकेची बिनविरोध निवडणूक' दुष्काळ निमित्त तकलादू : विखेंना अडसर शिंदेंचा; थोरात निर्णायक

राज्यातच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडात सहकारात अहिल्यानगरची जिल्हा बँक सर्वात अग्रेसर बँक म्हणून ओळखली जाते. या बँकेची स्थापना १९५८ ला झाली. प्रारंभी मोतीलाल फिरोदिया यांच्या नेतृत्वाखाली प्रशासकीय मंडळ होते. बँकेच्या संचालक मंडळाची पहिली निवडणूक १९६२-६३ च्या दरम्यान झाली. जामखेडचे साहेबराव पाटील पहिले चेअरमन झाले. तदनंतर जिल्हा बँकेच्या अनेक निवडणुका झाल्या पण दुष्काळाचे कारण देऊन कधीच बिनविरोध झाल्या नाही. दुष्काळ तर या जिल्ह्याच्या पाचवीलाच पुजला म्हणून निवडणुका बिनविरोध झाल्या नव्हत्या. दुष्काळामुळे या निवडणुका कदाचित पुढे ढकलल्या. पण त्या बिनविरोध झाल्या नव्हत्या. यावेळी त्या बिनविरोध होण्याची शक्यता फारच धूसर दिसते. यावेळी इच्छुक उमेदवारांची संख्या 'न भूतो' अशीच असल्याने बिनविरोधचा प्रस्थापितांचा फंडा फेल ठरणार असाच रागरंग दिसतो. त्यात ही निवडणूक प्रस्थापितांविरुध्द विस्थापित अशीच होत आहे, असा राजकीय संघर्ष जिल्हा बँकेच्या इतिहासात पहिल्यांदाच होणार असून पक्षविरहित निवडणुकीच्या परंपरेला छेद बसणार.

## जामखेड केंद्रबिंदू

बँकेची पहिली निवडणूक १९६२-६३ ला झाली. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे निकटवर्तीय जामखेडचे साहेबराव पाटील पहिले चेअरमन झाले. जिल्ह्यातील सहकार उत्तर नगर जिल्ह्यात फोफावला असला तरी बँकेच्या सत्तेचा केंद्रबिंदू सातत्याने जामखेडभोवतीच फिरत राहिला. साहेबराव पाटील, गोपाळराव सोले पाटील, आबासाहेब निंबाळकर आदि दिग्गजांनी बँकेत नेतृत्व केले होते. सोलेदादांकडे राज्यातील वेगवेगळ्या तब्बल अठरा सहकारी संस्थांचे नेतृत्व होते. एकेकाळी सोले पाटील हेच बाळासाहेब विखे यांच्या सहकारातील राजकारणाचा हुकमी एक्का होते. पुढे राजकारण बदलत गेले हा भाग वेगळा. आता त्याच राजकारणाची पुनरावृत्ती विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या माध्यमातून होऊ पाहत असून सहकाराचा केंद्रबिंदू जामखेडकडे सरकू लागला आहे. ते पहिल्यांदाच जामखेडकडे जिल्हा बँकेच्या





राजकारणात विशेष सक्रिय झालेत. अर्थात हे धाडस प्रा.राम शिंदे हे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या ग्रीन सिग्नल शिवाय करणे शक्य दिसत नाही. शिंदेंचा खरा अडसर विखेंच्या राजकारणाला होऊ शकतो. त्यापेक्षाही तब्बल ६८ वर्षानंतर राज्यातील सभापती फिरोदिया, यांच्यानंतर विद्यमान सभापती प्रा.शिंदे हे जिल्हा बँकेच्या राजकारणात सक्रिय होत आहेत, ही बाब आवर्जुन लक्षात घ्यावी लागेल.

## बिनविरोधचा फंडा

जिल्हा बँकेच्या यापूर्वीच्या निवडणुका दुष्काळामुळे कधीच बिनविरोध झालेल्या नाही. १९७२ च्या दुष्काळी पार्श्वभूमीवरही निवडणूक झालीच होती. बिनविरोध निवडणुकीचा पायंडा जिल्हा बँकेत नव्हता आणि नाही, असा ठोबळमानाने निष्कर्ष काढता येत नाही. सोसायटी मतदारसंघाच्या काही जागा बिनविरोध जरुर होतात. पण संपूर्ण निवडणूक बिनविरोध क्वचित घडले असावे. जिल्हा बँकेत पूर्वी संचालक मंडळाच्या २७ जागा होत्या. आता त्या २१ झाल्या असून, १४ सोसायटी मतदारसंघ आहेत. ज्या नेत्याचा प्रभाव, त्या नेत्याकडे ती जागा जाते. पण चुरस ही या ७ जागांसाठी होते. त्या जागांच्या आधारेच सत्तेचे पारडे झुकते म्हणून त्यासाठी चुरस राहते. दुष्काळातील निवडणूक खर्चाचा मुद्दा पुढे करुन बिनविरोधचा फंडा मांडला जात आहे. त्यात तो थोरात, विखे, गडाख या प्रस्तापित नेत्यांनी पुढे केला. एकमेकांना विरोध करणारे 'बिनविरोध'साठी सहमती दर्शवत असतील तर त्याचे इंगित वेगळे असावे. त्यांच्या पुढे पहिल्यांदाच विस्थापितांचे आव्हान दिसते. म्हणूनच दुष्काळातील निवडणूक खर्चाचा मुद्दा पुढे केला जात आहे. पण बँकेला निवडणुकीसाठी १५ लाख पेक्षा जास्त खर्च नाही. मग त्याचा बाऊ करण्यात काय हशील..

## थोरातांचा सोधा

जिल्हा बँकेच्या राजकारणावर स्व.भाऊसाहेब थोरात यांचा मधल्याकाळात प्रचंड दबाव असायचा. बँकेच्या राजकारणात ते म्हणतील तीच पूर्वदिशा असा एक काळ होता. त्यांच्यानंतर बाळासाहेब थोरात यांच्याकडे नेतृत्व आले. ते बँकेचे संचालक झाले नाही पण सूत्रसंचलन स्वतःकडे ठेवले. त्यांचे नाते गोते आणि सोयरसंबंध जिल्ह्यातील अत्यंत प्रभावी घराण्याशी आहे. राजळे, कडू, गडाख, शेळके, तांबे यांच्यासह घुले, तनपुरे, काळे यांच्याशी त्यांचे सूत जुळते. त्यांचे 'सोयरे-धायरे' म्हणजे 'सोधा' जिल्ह्याच्या राजकारणातील अंतर्गत प्रभावी पक्षच आहे. या 'सोधा' पक्षाचा यापूर्वी शरद पवार यांनीसुद्धा आवर्जुन उल्लेख केला होता. याच सोधा लॉबीच्या माध्यमातून सोसायटी मतदारसंघाबरोबरच थोरात गट इतर सात ७ जागांवर प्रभाव पाडतो. परिणामी सत्ता केंद्र त्यांच्याकडे झुकते. थोरात गट प्रामुख्याने संगमनेर, अकोला, नेवासा, पाथर्डी, पारनेर, शेवगांव, राहुरी या सोसायटी जागांवर हुकमत ठेऊ शकतो. तसा श्रीरामपुर, कोपरगाव, श्रीगोंद्यात काही प्रमाणात चमत्कार घडवू शकतो.

## विखेंना शिंदेंचा अडसर

जिल्हा बँकेच्या राजकारणात विखे गट शक्यतो निर्णायक नसतो. तर तडजोडीतून तो सत्ता हस्तगत करू शकतो, असाच राजकीय पूर्व इतिहास आहे. वास्तविक जिल्हा बँकेच्या प्रारंभीक काळात विखे-थोरात एकच होते. पद्मश्री विठ्ठलराव विखे आणि भाऊसाहेब थोरात एकाचवेळी अध्यक्ष-उपाध्यक्ष होते. पण पुढे बँकेच्या राजकारणात विखे-थोरात गट आमने - सामने आले. थोरात यांच्याबरोबर मारुतराव घुले, आबासाहेब निंबाळकर, शंकरराव काळे, फिरोदिया राहिले तर विखेंची खिंड सोलेपाटील यांनी लढवली. हांडे, म्हस्के (पाथर्डी) पाचपुते, आणि काही संचालकांच्या मदतीने राधाकृष्ण, गोपाळराव सोले बँकेचे अध्यक्ष जरूर झाले. पण थोरातांचे सत्ताकेंद्र फारसे डळमळीत झाले नाही. विखे गटाला प्रामुख्याने राहाता, जामखेड, श्रीगोंदा, कर्जत, श्रीरामपुर, पारनेर आदि ठिकाणाहून साथ मिळते. गेल्यावेळी जामखेडचे राळेभात विखेंच्या बरोबर होते पण यावेळी पहिल्यांदाच कर्जत-जामखेडमध्ये सभापती प्रा. राम शिंदे प्रभावी ठरत आहेत. श्रीगोंद्याचे जगताप आणि श्रीरामपुर त्यांच्या बाजूने झुकण्याची शक्यता आहे. विखे गटाच्या प्रभावी क्षेत्रावर प्रा.राम शिंदे यांचा अडसर निर्माण झाल्यानेच थोरात-विखे-गडाख यांनी बिनविरोधचा फंडा पुढे करून सहमती एक्स्प्रेस पुढे केली आहे पण इच्छुक उमेदवाराची गर्दी लक्षात घेता बिनविरोध होण्याची शक्यता मावळलेली दिसते. उलट पक्षी प्रस्थापितांपुढे विस्थापितांनी तगडे आव्हान उभे केल्याने चित्र दिसते.

## पक्षीय शिरकाव

स्व. यशवंतराव चव्हाण यांनी मुळा धरणाच्या उद्घाटनप्रसंगी राहुरीच्या कार्यक्रमात सहकारात येताना राजकीय जोडे बाजुला ठेवण्याचा मोलाचा सल्ला दिला होता. तो काही काळ तंतोतंत पाळला गेला. पण गेली पंचवीस वर्षापासून सहकाराचा मोठा प्रभाव सुरु झाला. पदमश्री विखे यांनी ते तत्व अंगीकारले पण पुढे त्याला इतर नेत्यांनी हरताळ फासला. सहकारातील सर्वच नेते राजकारणात सक्रिय झाले. विखे घराणे त्याला अपवाद ठरले नाही. कारखाना आणि जिल्हा बँकेत पक्षीय राजकारण आले. परिणामी पूर्वी स्थानिक जिल्हा पातळीवर जे निर्णय व्हायचे ते आता राज्यपातळीवरील नेते घेत आहे. त्यांच्या कलाने आता सहकारातील राजकारण होऊ लागले आहे. जिल्हा बँक राजकारणावर यापूर्वी स्व. अजितदादा पवार यांचा मोठा हस्तक्षेप असायचा तोच कित्ता आता मुख्यमंत्री फडणवीस अप्रत्यक्षरित्या गिरवत आहेत पण या घडामोडीत जिल्ह्यातील शिंदे सेना पवारांची राष्ट्रवादीला मात्र बाजूला केल्याने शिंदे सेनेचे आमदार लंघे, खताळ, माजी आमदार मुरकुटे, हर्षदा काकडे आणि राष्ट्रवादीचे खासदार लंके यांच्या भूमिकेला महत्व प्राप्त होणार आहे

**(या लेखाचा पुढील भाग नंतरच्या अंकात)**

**- रामदास ढमाले,**
**ज्येष्ठ पत्रकार, मोबा. ८९९९८१०००३**



गावठी कट्टा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

# गावठी कट्टा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला अहिल्यानगर ते पुणे महामार्गावर पकडले

### १ गावठी कट्टा व १ जिवंत काडतूसासह ७१ हजारांचा मुद्देमाल जप्त, गुन्हा दाखल

नगर - अहिल्यानगर ते पुणे महामार्गावर बेलवंडी फाटा येथे गावठी कट्टा विक्रीसाठी आलेल्या तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. भागवत गिनेनदेव वनवे ((वय २६, रा. वनवेवाडी, ता. आष्टी, जि. बीड, हल्ली रा. देवदैठण, ता. श्रीगोंदा) असे त्याचे नाव आहे. या आरोपीकडून १ गावठी कट्टा व १ जिवंत काडतूससह ७१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यात अवैध अग्निशस्त्रे बाळगणारांचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेस दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस उपनिरीक्षक संदीप दरवडे व पोलीस अंमलदार सोमनाथ झांबरे, बाळासाहेब खेडकर, विशाल तनपुरे, भगवान सानप व भगवान धुळे अशांचे पथक तयार केलेले आहे. हे पथक १ ऑक्टोबर रोजी बेलवंडी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंद्यांची माहिती घेत असताना, गोपनिय माहिती मिळाली की, भागवत वनवे हा बेलवंडी फाट्यावळील शुभम गार्डन मंगल कार्यालयाजवळ गावठी कट्टा विक्री करण्यासाठी थांबला आहे. या माहितीच्या आधारे पथकाने नमूद ठिकाणी जाऊन भागवत वनवे यास ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडून ५० हजार रुपये किमतीचा १ गावठी कट्टा, १ हजार रुपये किमतीचे १ जिवंत काडतूस आणि २० हजार रुपये किमतीचा एक मोबाईल असा एकूण ७१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ताब्यातील आरोपीकडे कसून चौकशी केली असता, त्याने जप्त केलेला गावठी कट्टा व काडतूस हा संग्राम गोविंद पंडित (रा. गेवराई, जि. बीड, फरार) याच्याकडून खरेदी केल्याची माहिती दिली. याप्रकरणी आरोपीला जप्त केलेल्या मुद्देमालासह बेलवंडी पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असून त्याच्या विरुद्ध आर्म अ‍ॅक्ट ३/२५, ७/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सोन्याचे दागिने व पैशांसाठी छळ केल्याने विवाहितेने रेल्वेसमोर केली आत्महत्या

नगर - नगर तालुक्यातील निंबळक येथे माहेरहून सोन्याचे दागिने व पैसे आणण्यासाठी सतत विनाकारण कुरापती काढून शारीरिक व मानसिक छळ केल्यामुळे कंटाळून निर्मला अविनाश शिंदे (रा. निंबळक, ता. नगर) या विवाहितेने रेल्वेसमोर उडी मारून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पती अविनाश शिंदे याच्या विरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मयत विवाहितेचे वडील सुरेश बंडू भोसले (वय ६६, रा. जवखेडे दुमाला, ता. पाथर्डी) यांनी ३० सप्टेंबर रोजी फिर्याद दिली आहे. आरोपी अविनाश बबन शिंदे (रा. निंबळक, ता. नगर) याने सन २०२० पासून ते १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास पर्यंत मयत महिला निर्मला हिच्याकडे माहेरहून सोन्याचे दागिने व पैसे आणण्यासाठी वारंवार तगादा लावला होता. तसेच विनाकारण कुरापती काढून तिचा शारीरिक व मानसिक छळ केला. या सततच्या त्रासाला कंटाळून फिर्यादीची मयत मुलगी निर्मला हिने १७ सप्टेंबर रोजी निंबळक येथे रेल्वेसमोर उडी मारून आपली जीवनयात्रा संपवली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अविनाश शिंदे याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०८ प्रमाणे आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विश्वनाथ कोडम यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - विश्वनाथ गोपय्या कोडम (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## काशिनाथ तापोळे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील काशिनाथ संपत तापोळे (वय ७६) यांचे ३० सप्टेंबर रोजी रात्री ९:१५ वा. अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भगतसिंग चौकातील अदसविका न्यूज पेपर एजन्सीचे मालक दत्तात्रय तापोळे व संजय तापोळे यांचे वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



खासदार निलेश लंके यांनी आपल्या समर्थकांसह उमेदवारी अर्ज दाखल केला.

# ...तर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होणार नाही; निलेश लंके यांनी अर्ज दाखल केल्यानंतर मांडली भूमिका

नगर - जिल्हा बँक ही शेतकऱ्यांची कामधेनू म्हणून ओळखली जाते. सध्या जिल्ह्यात दुष्काळाची गंभीर परिस्थिती असताना या संस्थेची निवडणूक बिनविरोध होणे गरजेचे आहे. निवडणूक बिनविरोध होत असेल तर त्याचे निश्चितच स्वागत केले पाहिजे. पण व्यक्तीद्वेष ठेवून निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न केला तर ती बिनविरोध होणार नाही. प्रमुख मंडळींनी आपापले मतभेद बाजूला ठेवून एकत्र बसले तर निवडणूक बिनविरोध होऊ शकते, अशी भूमिका खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केली.

जिल्हा बँक निवडणुकीसाठी १ ऑक्टोबर रोजी खा. लंके यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर लंके म्हणाले, निवडणूक ही ठरवून करण्यासारखी गोष्ट नसते. वेळप्रसंगी निर्णय घेतले जातात व त्यानुसार निवडणुकीला सामोरे जावे लागते. माझ्यासोबत नेहमीच अनेकजण असतात. हे शक्तिप्रदर्शन नाही. शक्तिप्रदर्शन करायचे असते तर हजारो लोक आणले असते. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध झाली पाहिजे, याबाबत आमचे सर्वांचे सहमत आहे. महाविकास आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली असून, निवडणूक बिनविरोध होत असेल तर त्याचे स्वागत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या शेतकऱ्यांसाठी ही संस्था काम करते, तोच शेतकरी अडचणीत असताना संस्थेची निवडणूक लावणे ही योग्य बाब नाही, असे लंके म्हणाले.

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदासाठी कोणाचा अजेंडा किंवा उमेदवार निश्चित झाला आहे का, या प्रश्नावर लंके यांनी अध्यक्षपदाचा निर्णय निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होईल, असे सांगितले.

आज अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर आणि उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतरच बिनविरोध करण्याची खरी प्रक्रिया सुरू होते. निवडून आलेल्या संचालक मंडळात बहुमत कोणाच्या बाजूने आहे, त्यानुसार अध्यक्ष निवडला जातो. त्यामुळे आताच अध्यक्षपदाचा उमेदवार ठरला आहे, असे म्हणता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

## दुष्काळग्रस्तांना तातडीने मदतीची मागणी

दरम्यान, पालकमंत्री जामखेड तालुक्यात दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करत असल्याबाबत बोलताना लंके यांनी सरकारकडून ठोस मदतीची मागणी केली. दुष्काळग्रस्त भागाची पाहणी झालीच पाहिजे. राज्याच्या प्रमुखांनी शेतकऱ्यांच्या बांधावर आणि शेतावर जाऊन परिस्थिती पाहिली पाहिजे. मात्र केवळ आश्वासन देऊन भागणार नाही. सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना ठोस आणि तातडीची मदत मिळाली पाहिजे. शेतकरी मोठ्या संकटात आहे. पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने टँकर सुरू करणे, पंचनाम्याऐवजी सरसकट पंचनामे करणे, शेतमजूरांनाही मदत देणे तसेच चारा छावण्या आणि चारा डेपो सुरू करण्याची मागणी त्यांनी केली.

# 'जिल्हा बँक निवडणुकी'साठी ४ दिवसात ८४६ अर्जांची विक्री

नगर - जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी मागील चार दिवसात ८४६ एव्हढे विक्रमी अर्ज विक्री झाले आहेत. तर १ ऑक्टोबर रोजी मोठ्या संख्येने उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये जिल्ह्यातील मात्तबर नेते, खासदार, आमदार यांचा समावेश आहे.

जिल्हा बँकेच्या एकूण २१ संचालकांच्या जागेसाठी ही निवडणूक होत असून, २८ सप्टेंबरपासून अर्ज विक्री व दाखल करण्यास प्रारंभ झाला आहे. २८ व २९ सप्टेंबर रोजी ५३१ उमेदवारी अर्ज विक्री झाले होते. तर ९ जणांनी अर्ज दाखल केले होते. १ ऑक्टोबर रोजी १६६ अर्ज विक्री झाले. त्यामुळे विक्री झालेल्या अर्जांची संख्या ८४६ वर पोहोचली आहे. तर १ ऑक्टोबर रोजी मोठ्या संख्येने अर्ज दाखल झाले आहेत. खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते, महानगर बँकेच्या अध्यक्षा गितांजली शेळके यांनी सेवा सोसायटी मतदारसंघातून आपले उमदेवारी अर्ज दाखल केले. तर माजी संचालक प्रशांत गायकवाड यांनी बिगरशेती मतदारसंघातून अर्ज दाखल केला आहे. याशिवाय राहुरीचे हर्ष अरुण तनपुरे, अकोल्याचे माजी आमदार वैभव पिचड, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सिताराम गायकर, आमदार किरण लहामटे, शेवगाव-पाथर्डीच्या आमदार मोनिका राजळे, श्रीगोंद्यातून नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे व अनुराधा नागवडे, कर्जतमधून अंबादास पिसाळ, जामखेडमधून अमोल राळेभात, नगरमधून जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बाळासाहेब हराळ व जिल्हा सहकारी बोर्डाच्या अध्यक्षा जयमाला भारत सोलेपाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान २९ सप्टेंबर रोजी राहुरी विकास सोसायटी मतदारसंघातून आमदार प्राजक्त तनपुरे यांनी, तर कर्जत महिला मतदारसंघातून जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मंजुषा गुंड यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. २८ सप्टेंबर रोजी माजी संचालक राहूल जगताप यांनीही अर्ज दाखल केला आहे.



जिल्हा बँक निवडणुकीसाठी अर्ज दाखल करताना आमदार काशिनाथ दाते.

# मतदार यादीतील अनियमितता आणि एसआयआर प्रक्रियेविरोधात निदर्शने

नगर - महाराष्ट्राच्या मतदार यादीतून मोठ्या प्रमाणात नावे वगळल्याच्या निषेधार्थ तसेच केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पक्षपाती भूमिकेविरोधात १ ऑक्टोबर रोजी विविध डावे पक्ष आणि पुरोगामी संघटनांच्या वतीने अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. या वेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत भारताच्या राष्ट्रपतींना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.



मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा समन्वयक कॉम्रेड प्रवीण सोनवणे म्हणाले की, महाराष्ट्राच्या मतदार यादीतून तब्बल २.०७ कोटी नावे वगळण्यात आली आहेत. ही संख्या छत्तीसगड राज्याच्या एकूण मतदारांपेक्षाही अधिक आहे. एसआयआर (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन) प्रक्रियेचा हा मोठा धक्का असून, राज्यातील एकूण ९.७९ कोटी मतदारांपैकी तब्बल २१.१४% मतदारांची नावे कमी करण्यात आली आहेत. ही टक्केवारी आणि एकूण संख्या अशा दोन्ही बाबतीत महाराष्ट्रात मतदारांची नावे वगळण्याचे प्रमाण उत्तर प्रदेशपेक्षाही जास्त आहे. विशेषतः २५ विधानसभा मतदारसंघांमध्ये ४०% किंवा त्याहून अधिक मतदारांची नावे काढण्यात आली आहेत. यातील बहुतांश मतदारसंघ हे मुंबई, पुणे, ठाणे आणि नाशिक जिल्ह्यांच्या परिसरातील आहेत. या सर्वाला केंद्रीय निवडणूक आयोग जबाबदार असून, त्यांनी अत्यंत पक्षपाती भूमिका घेतली आहे. त्यामुळे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवून निष्पक्ष व स्वतंत्र निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सहसचिव कॉम्रेड सुधीर टोकेकर यांनी सांगितले की, आम्ही निवेदनाच्या माध्यमातून एसआयआर प्रक्रिया तात्काळ थांबवण्याची मागणी केली आहे. जर निवडणूक आयोगाने ही मनमानी प्रक्रिया थांबवली नाही, तर डाव्या आघाडीच्या वतीने राज्यभरात व देशभरात तीव्र आंदोलने छेडली जातील.

केंद्रीय निवडणूक आयोगाची भूमिका पक्षपाती असल्याने मुख्य निवडणूक आयुक्तांना त्वरित हटवून निष्पक्ष व स्वतंत्र निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात यावी, एसआयआर प्रक्रिया तात्काळ थांबवावी, कारण यामुळे सामान्य नागरिकांच्या मतदान हक्काला गंभीर धोका निर्माण झाला आहे. मतदार यादीमधील अनियमितता, नावे कमी करणे व चुकीची नावे समाविष्ट करणे हे तातडीने थांबवून पारदर्शक पद्धतीने पडताळणी करण्यात यावी. निवडणूक प्रक्रियेबाबत सर्वपक्षीय बैठक घेऊन सर्व राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांना विश्वासात घेऊन तातडीने निर्णय घेण्यात यावा, अशा मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत.

या आंदोलनात कॉ. प्रवीण सोनवणे, कॉ. सुधीर टोकेकर, कॉ. सतीश पवार, कॉ. राजू वैराळ, कॉ. विनायक गोरखे कॉ. किशोर खाडे कॉ. नितीन जगधने, कॉ. ज्ञानदेव गायकवाड, कॉ. राजेंद्र कचरे यांच्यासह डाव्या पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### वाढवा बालकांची रोगप्रतिकार शक्ती

लहान मुलांची आजारांशी लढण्याची ताकद ही एका दिवसात येत नाही ती हळूहळू घडत असते यासाठी सर्वात पहिली गोष्ट म्हणजे आहार आहारात घरचे सात्विक अन्न असावे सकाळी नाचणीचे सत्व मुगाच्या डाळीचे पाणी दुपारी वरण भात पोळी पालेभाजी दही संध्याकाळी फळे जसे की केळी पपई चिकू सीताफळ असे ऋतू प्रमाणे मिळणारे फळ द्यावे आईचे दूध हे पहिल्या काही महिन्यांत सर्वात मोठे संरक्षण असते ते पोट भरते आणि आजारांपासून वाचवते बाळ जसे मोठे होईल तसे त्याला सर्व प्रकारच्या चवींची ओळख करून द्यावी जास्त तिखट जास्त खारट आणि बाजारातील पाकिटातील पदार्थांपासून दूर ठेवावे पाणी उकळून गार करून द्यावे दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे ऊन आणि खेळ सकाळचे कोवळे ऊन अंगावर घेतल्याने हाडे मजबूत होतात आणि शरीरात स्फूर्ती येते रोज मातीत खेळू द्यावे पळू द्यावे यामुळे शरीर सवयीने मजबूत होते तिसरी गोष्ट म्हणजे झोप लहान बाळाला दिवसातून अनेक वेळा झोप लागते झोपेतच त्याचे शरीर वाढते त्यामुळे झोपेत व्यत्यय आणू नये शांत खोलीत झोपवावे चौथी गोष्ट म्हणजे स्वच्छता हात पाय स्वच्छ ठेवावे जेवणापूर्वी हात धुण्याची सवय लावावी घर आणि अंगण स्वच्छ ठेवावे पाचवी गोष्ट म्हणजे मनाचे आरोग्य बाळाला मारू नये सतत रागवू नये त्याच्याशी गोष्टी सांगाव्या गाणी म्हणावी त्याला हसवावे आनंदी मन असलेले बाळ कमी आजारी पडते याशिवाय आपल्या स्वयंपाक घरातील काही गोष्टी जसे की हळद तुळशीची पाने आवळा गूळ सुंठ यांचा योग्य वापर जाणकार व्यक्तीच्या सल्ल्याने करावा आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे सर्व लसी वेळेवर देणे कुठलीही लस चुकवू नये या सर्व गोष्टींचे पालन केले तर बाळ नक्कीच सशक्त राहील आणि वारंवार आजारी पडणार नाही.

## पाककला

### डाळफ्राय

**साहित्य :** तूर डाळ १ वाटी, पाणी ३ वाट्या, बारीक चिरलेला कांदा १ मोठा, बारीक चिरलेला टोमॅटो १, हिरवी मिरची २, आले-लसूण पेस्ट १ चमचा, हळद १/२ चमचा, तिखट १ चमचा, धने पावडर १ चमचा, जिरे १/२ चमचा, मोहरी १/२ चमचा, हिंग चिमूटभर, कडीपत्ता ६-७ पाने, तूप २ चमचे, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर

**कृती :** डाळ स्वच्छ धुवून २० मिनिटे भिजवून ठेवा. कुकरमध्ये डाळ, पाणी, हळद, थोडे मीठ घालून ३ शिट्ट्या काढा. कढईमध्ये तूप गरम करा, जिरे, मोहरी, हिंग, कडीपत्ता घालून तडतडू द्या. कांदा घालून गुलाबी होईपर्यंत परतवा. आले-लसूण पेस्ट, हिरवी मिरची, टोमॅटो घालून मऊ होईपर्यंत शिजवा. तिखट, धने पावडर घालून परतवा. शिजलेली डाळ घालून गरजेनुसार पाणी घाला. ५ मिनिटे मंद आचेवर उकळा. चवीनुसार मीठ घाला. वरून बारीक चिरलेली कोथिंबीर घालून सजवा. गरम भाताबरोबर सर्व्ह करा.

## वास्तू

### २०२६ मध्ये शुभ रंग

✻ मुख्य दरवाजाला हलका पिवळा किंवा क्रीम रंग लावा, याने घरात लक्ष्मी स्थिर राहते.

✻ बैठक खोलीस पांढरा, हलका राखाडी किंवा हलका निळा. या रंगाने घरात शांतता राहते आणि पाहुण्यांना प्रसन्न वाटते.

✻ स्वयंपाक घरासाठी आग्नेय दिशा मंगळाची आहे, त्यामुळे इथे केशरी किंवा हलका नारंगी रंग शुभ आहे. लाल रंग टाळा, भांडणे वाढतात.

## सौंदर्य

✻ रोज सकाळी कोमट पाण्याने चेहरा धुवा. कधीही गरम पाण्याने चेहरा धुवू नका. गरम पाण्याने त्वचा कोरडी होते.

✻ चेहऱ्याला खोबरेल तेल किंवा बदाम तेलाने २ मिनिटे मसाज करा. तेल लावूनच झोपा. सकाळी चेहरा चमकदार होईल.

## सल्ला

मिक्सरच्या भांड्याला लसूण किंवा कांद्याचा वास येत असेल तर पाण्यात थोडा बेकिंग सोडा टाकून फिरवा. वास एकदम जाईल. **संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर २०२६

**म. गांधी जयंती, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, मृग २६|५५, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज मन प्रसन्न राहील. घरात आनंदाचे वातावरण असेल.

**वृषभ :** धनलाभ होण्याची शक्यता आहे. जुने मित्र भेटतील.

**मिथुन :** कामात यश मिळेल. प्रवास घडेल.

**कर्क :** मनात थोडी अस्वस्थता राहील. कुटुंबाची साथ मिळेल.

**सिंह :** मान सन्मान वाढेल. नवीन ओळखी होतील.

**कन्या :** खर्च वाढण्याची शक्यता आहे. आरोग्याची काळजी घ्या.

**तूळ :** जोडीदाराची साथ मिळेल. दिवस चांगला जाईल.

**वृश्चिक :** अचानक लाभ होईल. शत्रू दूर राहतील.

**धनु :** नोकरीत बदल दिसेल. ध्येय गाठाल.

**मकर :** थकवा जाणवेल. संध्याकाळी बरे वाटेल.

**कुंभ :** नवीन संधी मिळेल. पैशांची आवक होईल.

**मीन :** मनातील इच्छा पूर्ण होईल. देव दर्शन होईल.

## फिल्मीचक्कर क्र. १२५६ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | ■ | ४ | ५ | ६ |
| ७ | | | | ८ | | | |
| ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ |
| ९ | | ■ | १० | | | ■ | ११ |
| | ■ | १२ | ■ | | ■ | १३ | |
| १४ | | | ■ | १५ | १६ | | |
| | ■ | १७ | | ■ | | ■ | ■ |
| १८ | | ■ | ■ | १९ | | | |

**आडवे शब्द :-** १) ++ दिया और दर्द लिया (चित्रपटाचे नाव) ४) +++ की सहेली (चित्रपटाचे नाव) ७) प्रसिद्ध संगीतकारांची एक जोडी ज्यातील एकाचे निधन झाले आहे ९) मेरा ++ (चित्रपटाचे नाव) १०) राजकुमार, मीनाकुमारी यांचा एक चित्रपट ज्यातील गाणी खूपच प्रसिद्ध झाली १३) ++ हिन्दुस्तानी (चित्रपटाचे नाव) १४) संगीतकारांची एक जोडी ज्यातील एकजण देश सोडून पळून गेला आहे १५) ++ ++ दरपन कहलाये भले बुरे सारे कर्मों को देखे ('काजल'मधील गाणे) १७) ++ स्टोरी (चित्रपटाचे नाव) १८) सुधीरकुमार, सुबोधकुमार यांच्या अभिनयाने व सुंदर गाण्यांनी नटलेला एक जुना चित्रपट १९) राजेश खन्ना, शबाना आझमी, सचिन, पिंचू कपूर, गुलशन ग्रोव्हर, ए. के. हंगल यांच्या या चित्रपटात भूमिका आहेत

**उभे शब्द :-** १) अमीरखान, माधुरी दीक्षित, अनुपम खेर, सईद जाफरी यांचा एक चित्रपट २) जुन्या काळातील एक चित्रपट नृत्यांगना ३) ++ ज्ञानेश्वर (चित्रपटाचे नाव) ४) ++ जहां से अच्छा हिन्दुस्तां हमारा हमारा हम बुलबुले है इसकी (गाणे) ५) फरिदा +++ (अभिनेत्री) ६) ++ दमयंती (महाभारत कथेतील एक प्रसिद्ध प्रणयी जोडी) ८) ++ ++ + डरना क्या (चित्रपटाचे नाव) ९) नवीन निश्चल, रेखा यांचा एक चित्रपट ११) एक दिवंगत गीतकार १२) +++ हसन (अभिनेता) १३) ++ बलराम (चित्रपटाचे नाव) १६) राम तेरी गंगा मैली चित्रपटाचा नायक +++ कपूर

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार :** अपयश आले म्हणून खचून जाऊ नका, कारण पुन्हा शून्यातून सुरुवात करायची ताकद फक्त अपयशातच असते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### चुंबक फक्त लोखंडालाच का चिकटतो अन्य धातूला का नाही?

आपल्या घरात अनेक वस्तू असतात. काही लाकडाच्या असतात, काही कागदाच्या असतात, काही प्लास्टिकच्या असतात आणि काही लोखंडाच्या असतात. आपण जर एक चुंबक हातात घेतला आणि घरातल्या सगळ्या वस्तूंना लावून पाहिला तर एक गंमत लक्षात येईल. चुंबक फक्त लोखंडी वस्तूंनाच चिकटतो. तो लोखंडी कपाटाला चिकटतो, लोखंडी खिळ्याला चिकटतो, लोखंडी सुरीला चिकटतो. पण तो लाकडी टेबलाला चिकटत नाही, काचेच्या ग्लासाला चिकटत नाही, कागदाच्या पुस्तकाला चिकटत नाही. असे का घडते असा प्रश्न तुम्हाला कधी पडला आहे का? यामागे खूप मोठे शास्त्र लपलेले आहे.आपल्या डोळ्यांना जे दिसते ते म्हणजे वस्तूचा बाहेरचा आकार. पण वस्तूच्या आत काय आहे हे आपल्याला दिसत नाही. प्रत्येक वस्तूच्या आत कोट्यावधी अगदी छोटे छोटे कण असतात. हे कण इतके छोटे असतात की त्यांना आपण उघड्या डोळ्यांनी पाहू शकत नाही. त्यांना पाहण्यासाठी खूप मोठ्या यंत्राची गरज लागते.

या छोट्या कणांना परमाणू म्हणतात. प्रत्येक वस्तूचे परमाणू वेगवेगळे असतात. लाकडाचे परमाणू वेगळे, कागदाचे परमाणू वेगळे आणि लोखंडाचे परमाणू वेगळे.आता लोखंडाच्या परमाणूंची गोष्टच वेगळी आहे. लोखंडाच्या प्रत्येक परमाणूच्या अंगात स्वतःची एक छोटी चुंबकीय शक्ती असते. म्हणजे प्रत्येक परमाणू हा स्वतःच एक छोटा चुंबक आहे असे समजा. पण गंमत अशी की हे छोटे चुंबक लोखंडाच्या आत इकडे तिकडे विस्कटलेले पडलेले असतात. काहींचे तोंड वर असते, काहींचे खाली असते, काहींचे डावीकडे तर काहींचे उजवीकडे. त्यामुळे एकाची शक्ती दुसऱ्याच्या शक्तीला मारून टाकते आणि बाहेरून पाहिले तर लोखंडामध्ये काहीच शक्ती दिसत नाही. तो एक साधा लोखंडाचा तुकडा वाटतो.

जेव्हा आपण एक मोठा चुंबक लोखंडाच्या तुकड्याजवळ आणतो तेव्हा काय होते? मोठ्या चुंबकाभोवती एक अदृश्य शक्तीचे वर्तुळ असते. ती शक्ती डोळ्यांना दिसत नाही पण ती असते. त्या शक्तीच्या प्रभावाने लोखंडाच्या आतले सगळे छोटे छोटे परमाणू जागे होतात. आणि सगळे एकाच दिशेने तोंड करून शिस्तीत उभे राहतात. जशी शाळेत सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी सगळी मुले एका ओळीत उभी राहतात अगदी तशीच. आता सगळे परमाणू एका दिशेला आले की त्यांची छोटी छोटी शक्ती एकत्र येते आणि एक मोठी शक्ती तयार होते. आता तो लोखंडाचा तुकडा साधा राहत नाही तो स्वतःच एक चुंबक बनून जातो. आणि मग निसर्गाचा नियम आहे की दोन चुंबक एकमेकांना ओढून घेतात.

म्हणून मोठा चुंबक आणि लोखंडाचा तुकडा जो आता छोटा चुंबक बनला आहे ते दोघे एकमेकांना घट्ट ओढून घेतात आणि चिकटून बसतात.आता दुसरा विचार करा की लाकडामध्ये किंवा कागदामध्ये असे का होत नाही. त्याचे कारण असे की लाकडाच्या आणि कागदाच्या परमाणूंमध्ये चुंबक बनण्याचा गुणच नाही. त्यांच्या परमाणूंमध्ये स्वतःची चुंबकीय शक्ती नसते. त्यामुळे मोठा चुंबक कितीही जवळ आणला तरी त्यांच्या परमाणूंवर काहीच परिणाम होत नाही. ते रांगेत उभे राहत नाहीत आणि त्यांच्यात चुंबकीय शक्ती तयार होत नाही. म्हणून चुंबक त्यांना ओढू शकत नाही.शास्त्रज्ञांनी अनेक वर्षे प्रयोग करून हे शोधून काढले आहे की या संपूर्ण जगात फक्त तीन धातू असे आहेत ज्यांच्या परमाणूंमध्ये रांगेत उभे राहण्याचा आणि चुंबक बनण्याचा गुण आहे. ते तीन धातू म्हणजे लोखंड, निकेल आणि कोबाल्ट. या तीन धातूंव्यतिरिक्त इतर कोणत्याही वस्तूमध्ये हा गुण नाही. म्हणूनच आपला चुंबक फक्त लोखंडालाच चिकटतो आणि बाकी कशालाही चिकटत नाही. हे निसर्गाचे एक गुपितच आहे जे आपल्याला विज्ञानामुळे समजते.

### पाण्याचे महत्त्व

एक होता गाव. त्या गावात टिल्लू नावाचा एक मुलगा राहत होता. टिल्लूला पाण्याची अजिबात किंमत नव्हती. सकाळी उठल्यापासून तो नळ चालूच ठेवायचा. दात घासताना नळ चालू, हात धुताना नळ चालू. आईने सांगितले की नळ बंद कर, तर तो म्हणायचा अगं आई, आपल्या विहिरीत खूप पाणी आहे. शाळेत गेला की तिथेही नळ अर्धवट बंद ठेवून यायचा.

मित्र पाणी पीत असताना मुद्दाम जास्त पाणी सांडायचा. एक दिवस काय झाले, गावातले सगळे नळ बंद झाले. विहिरीचे पाणी आटले. टिल्लूच्या घरातल्या नळातून एक थेंबही पाणी येईना. टिल्लूला खूप तहान लागली. त्याने आईला पाणी मागितले.

आई म्हणाली, घरात पाण्याचा एकच हंडा शिल्लक आहे, तो संपला की पाणी संपले. टिल्लू पाणी शोधायला बाहेर पडला. सगळीकडे लोक हंडा घेऊन पाण्यासाठी फिरत होते. एका हंड्यासाठी तासभर रांगेत उभे राहावे लागत होते. टिल्लूला तेव्हा कळले की पाण्याशिवाय जगणे किती कठीण आहे. पाणी नसेल तर जेवण बनत नाही, झाडे सुकून जातात, जनावरे तडफडतात. त्याच रात्री टिल्लूच्या स्वप्नात एक आजोबा आले ते म्हणाले, मी पाणी आहे. तू मला रोज वाया घालवतोस. लक्षात ठेव, मी आहे तर जीवन आहे. मी नसेल तर काहीच नाही. टिल्लू घाबरून जागा झाला आणि त्याने ठरवले की यापुढे मी एक थेंबही पाणी वाया घालवणार नाही.

दुसऱ्या दिवशी पाणी आले. टिल्लूने सगळ्या गावाला गोळा केले आणि सांगितले, पाणी हे देवासारखे आहे. ते जपून वापरा. तेव्हापासून टिल्लू नळ बंद करायचा, पावसाचे पाणी साठवायचा, आणि सगळ्यांना सांगायचा की थेंबे थेंबे तळे साचे.

तात्पर्य : पाणी आहे तर उद्या आहे. पाण्याचा एक एक थेंब वाचवा.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

मृगजळ दिसते, वाटते पाणी जवळ आहे, जो जो त्याजवळ जावे तो ते दूरवर असतांना दिसते. आम्ही त्याच्या पाठीपाठ धावतो, त्याच्याजवळ जाण्याचा प्रयत्न करतो. पण ते काही मिळत नाही. अशीच गोष्ट सांसारिक सुखाच्या बाबतीत घडते. मनाची तहान मिटत नाही व अधिकाधिक लोभी होत जाते. त्याला असे वाटते की ह्या भौतिक वस्तूपासून समाधान मिळेल त्यापासून सुख मिळेल. परंतु हे दुष्ट चक्र चालूच राहते. त्याला वाटते की दुसऱ्याजवळ जे काही आहे ते आपल्याला मिळाल्यावर आपणाला अधिक सुख होईल म्हणून ते मिळविण्याची त्याला इच्छा होते किंवा त्याला असेही वाटते की जे काही त्याच्याजवळ आहे ते त्याच्या सुखासमाधानाला पुरेसे नाही. तेव्हा अधिक काही मिळवायला हवे.

लोभ माणसाला भयानक रस्त्याला लावतो. तो आमचे लक्ष, आत्मा यांना परमेश्वरापासून दूर नेतो. ते आम्हाला हिंसक बनविते जेव्हा जी वस्तु आमची नाही ती दुसऱ्याकडून घेण्याची, बळकावण्याची आम्ही इच्छा करतो. चिनी धर्मात सांगितले आहे, अधिकाधिक इच्छा ठेवण्यापेक्षा दुसरा मोठा गुन्हा नाही, असमाधानी असण्यापेक्षा दुसरे मोठे संकट नाही, लोभी होण्यापेक्षा दुसरे मोठे दुर्भाग्य नाही. (ताओ ती चिंग ४६) आमच्या इच्छा भागविण्यासाठी आम्ही खोट्याचा सहारा घेतो.

शेवटी लोभ आम्हाला स्वार्थी बनवितो. आपापसात वाटून खाण्यापेक्षा स्वतःच सारे स्वाहा: करतो.जैन धर्मात सांगितले आहे,अज्ञानी लोकांना ऐषआरामात जीवन घालविणे आवडते. इंद्रिय सुखासाठी सतत धडपडतात.

आपल्या इच्छांना वैतागून ते शक्तीहीन होतात आणि त्यामुळे त्यांच्या पदरी फक्त दुःखच पडते. अंधारात वेढलेला माणूस दुःखापासून मुक्त होऊ शकत नाही. कारण तो इच्छांमध्ये गुंतून पडतो, लंपट

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

शिवानीदीदी : हो, अगदी बरोबर. वरवर हे आईवडील आणि मुलं असं नातं आहे. पण मुळात, आईवडिलांचं त्यांच्या आयुष्यात त्यांची मुलं बनून आलेल्या प्रत्येक आत्म्याशी वेगवेगळं कार्मिक खातं आहे. त्यामुळे पालकांचं त्यांच्या प्रत्येक मुलाशी होणारं संभाषणही वेगवेगळं असेल. हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे जो आपल्याला आपल्या जखमा भरून काढायला मदत करू शकतो. हे जाणल्यानंतर आपल्या पालकांनी आपल्या बरोबर पक्षपात केला अशी तक्रार आपण कधीच करणार नाही.

सुरेश ओबेरॉय : माझ्या कुटुंबातील कोणी एक आमच्या दोघांचं पूर्वीचं कार्मिक खातं आहे म्हणून माझ्याशी अमुकअमुक वागतो, अशी कल्पना करणंही किती अवघड आहे.

शिवानीदीदी : मला एक असा माणूस माहीत आहे ज्याचे आईवडील त्याच्या बरोबर राहतात. तो त्यांच्यासाठी सगळं करतो, तेही खूप प्रेमाने. तरीही, आईवडील त्याच्या भावाचीच प्रशंसा करतात. हे असं गेली अनेक वर्षे घडत आहे.

सुरेश ओबेरॉय : एक मूल सेवा करत आहे आणि त्याचं बक्षीस दुसऱ्याला मिळतं आहे!

शिवानीदीदी : जो आईवडिलांची सेवा करत आहे त्याने हे लक्षात ठेवायला हवं - 'माझं माझ्या आईवडिलांबरोबर पूर्वजन्मीचं कार्मिक खातं (ऊर्जेची देवाणघेवाण) आहे... माझ्या कष्टांचं श्रेय जर मला मिळत नसेल तर तोही कार्मिक खात्याचाच भाग आहे... आणि कोणत्याही कष्टाशिवाय जर माझ्या भावाला श्रेय मिळत असेल तर ती माझ्या आईवडिलांच्या आत्म्यांशी त्याच्या कार्मिक खात्याची देवाण-घेवाण आहे. जेव्हा आपल्याकडे आत्मा आणि कर्म या बाबत ज्ञान असतं तेव्हा आपल्या

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बंटी : अरे, तू काल नदीत बुडत होतास, मी वाचवलं, थँक्यू पण नाही म्हणालास!

पिंट्या : अरे, बुडत नव्हतो रे, मी पाण्यात पोहायला शिकत होतो, तू मध्ये येऊन सगळा खेळ बिघडवलास!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ जगातील सर्वात लांब सीमा कोणत्या दोन देशांमध्ये आहे?

– अमेरिका – कॅनडा (८,८९१ किमी)

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

१) प्रजननसंस्थेतील विकृती : स्त्रियांचा योनीमार्ग, गर्भाशयमुख, गर्भाशयाचा आकार, बीजवाहिनी नलिका, स्त्रीबीजकोष हे प्राकृत अवस्थेत असणे गरजेचे असते. पुरुषांमध्ये वृषणग्रंथी, वृषणकोषांनी शुक्रजंतू तयार करणे ही अवस्था प्राकृत असणे आवश्यक असते. यापैकी कोणत्याही अवयवात विकृती असेल तर गर्भधारणा होत नाही.

२) हार्मोन्समधील असंतुलन :यालाच मराठीमध्ये संप्रेरके असे म्हणतात. आपल्या शरीरामध्ये अकरा अंत:स्रावी ग्रंथी असतात. त्या ग्रंथी अंत:स्राव तयार करतात. यालाच हार्मोन्स किंवा संप्रेरके असे म्हणतात. शारीरिक व मानसिक वाढीसाठी तसेच प्रजनन संस्थेच्या वाढीसाठी स्त्री व पुरुषांमध्ये या हार्मोन्सचे प्रमाण प्राकृत योग्य असणे आवश्यक असते. स्त्रियांमध्ये विशेषत: पिच्युटरी आणि ओव्हरीचे महत्त्व जास्त आहे, तर पुरुषांमध्ये पिच्युटरी व टेस्टीजचे महत्त्व जास्त असते. स्त्रियांची मासिकपाळी वेळेवर येणे, बीजनिर्मिती होणे, बीज तयार होऊन फुटणे, गर्भाची वाढ होणे हे सर्व हार्मोन्सच्या प्रमाणावरच अवलंबून असते; परंतु हार्मोन्सचे प्रमाण असंतुलित झाल्यास नियमित येणारी मासिकपाळी अनियमित होते. कधी लवकर येते, तर कधी उशिरा येते, तर कधी येतच नाही. बीजनिर्मिती होतच नाही. स्त्रीबीजकोषाला सूज येते व स्त्रीबीज निर्मिती परिपक्व न होता छोटे बीज तयार होते व त्यामुळे गर्भधारणा होत नाही. पुरुषांच्या टेस्टीजमध्ये जर दोष असेल तर जननेंद्रियाची वाढ होत नाही. शुक्रजंतू अजिबात तयार होत नाहीत किंवा अल्प प्रमाणात तयार होतात. किंवा शुक्रजंतूंची हालचाल मंद असते. तसेच इंद्रियाला ताठरता येत नाही. पुरुषांमधील पौरुषत्व या हार्मोन्सवर अवलंबून असते.

वंध्यत्वाचे प्रकार :

१) प्राथमिक वंध्यत्व :कधीच गर्भधारणा झालेली नसणे, याला प्राथमिक वंध्यत्व असे म्हणतात. २) दुय्यम वंध्यत्व -एकदा गर्भधारणा झाल्यानंतर काही कारणास्तव अपत्यप्राप्ती न होणे याला दुय्यम वंध्यत्व असे म्हणतात.वंध्यत्वाची तपासणी :

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



भारतीय जनता पार्टी ओबीसी शहर जिल्हाध्यक्ष सौ. स्वाती सिरसुल यांच्या पुढाकाराने दिल्लीगेट येथील जनसंपर्क कार्यालयात 'शासकीय योजना व बचत गट' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी नगरसेविका सौ. मयुरी जाधव होत्या. यावेळी महिला उपस्थित होत्या.

# अहिल्यादेवी महिला कल्याणकारी योजना व बचत गट संघटनेची स्थापना

**अध्यक्षपदी विद्या एक्कलदेवी यांची निवड**

नगर – महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासोबतच बचत गटांच्या माध्यमातून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने अहिल्यादेवी महिला कल्याणकारी योजना व बचत गट संघटनेची स्थापना करण्यात आली. संघटनेच्या अध्यक्षपदी सौ. विद्या एक्कलदेवी यांची निवड करण्यात आली.

भारतीय जनता पार्टी ओबीसी शहर जिल्हाध्यक्ष सौ. स्वाती सिरसुल यांच्या पुढाकाराने दिल्लीगेट येथील जनसंपर्क कार्यालयात 'शासकीय योजना व बचत गट' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी नगरसेविका सौ. मयुरी जाधव होत्या. यावेळी महिला उपस्थित होत्या.

प्रारंभी दीपप्रज्वलन करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. चर्चासत्रात महिलांनी विविध अडचणी व शासकीय योजनांबाबत चर्चा केली. वंचित व गरजू महिलांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी संघटितपणे काम करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सौ. स्वाती सिरसुल यांनी नूतन अध्यक्षा विद्या एक्कलदेवी यांच्या सामाजिक व बचत गट क्षेत्रातील कार्याची माहिती दिली. गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ त्या बचत गटांच्या माध्यमातून कार्यरत असून, त्यांनी १०० हून अधिक बचत गटांची निर्मिती करून एक हजाराहून अधिक महिलांना जोडल्याचे त्यांनी सांगितले. २०१३ मध्ये सावेडी भागात महिलांच्या उत्कर्षासाठी बचत गट संस्थेची नोंदणी करून त्या सातत्याने कार्यरत असल्याचेही सांगण्यात आले. यावेळी सौ. सिरसुल यांच्या हस्ते विद्या एक्कलदेवी यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

संघटनेच्या कार्याध्यक्षपदी सौ. स्वाती सिरसुल, उपाध्यक्षपदी सौ. स्वाती पवळे व सौ. सुनीता कुरापट्टी, सचिवपदी सौ. ज्योती कुलकर्णी, सहसचिवपदी कांचन शिंदे आणि खजिनदारपदी सौ. वंदना बोरलीकर यांची निवड करण्यात आली. सदस्यपदी प्रिया कनोरे, मंगल गाजरे, पूजा राठोड, अंकिता सोनवणे, मयुरी गारुडकर, सुजाता वाघ, छाया सुडके, उषा बेंद्रे, मीरा गदादे, प्रियंका अग्रवाल, सोनी निकम, वर्षा राऊत, निशा ढगे, मानसी कांबळे, लीना परदेशी, पूजा पाठक, सोनी उन्हाळे, दीपा चिल्का, रजनी कोडम, शांता बिजा, वासंती मुनगेल, मीरा भगत व दिपाली लंगोटे यांची निवड झाली.

सल्लागारपदी नगरसेविका सौ. मयुरी जाधव, सीए सुनंदा रच्चा, सौ. स्वाती मुर्तडकर, लता पुलगम व नीता मंचे यांची निवड करण्यात आली.

कल्याण रोडलगत नालेगाव, दातरंगे मळा, शिवाजीनगर, आठवण खंडोबा, रेल्वे स्टेशन रोड, मार्केटयार्ड, माळीवाडा, तोफखाना, बालिकाश्रम रोड, श्रमिकनगर, पाइपलाइन रोड, तपोवन रोड, बोलेगाव व एमआयडीसी परिसरातील रोजंदारीवर काम करणाऱ्या गरीब व कष्टकरी महिलांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्याबरोबरच पात्र महिलांना बचत गटात सहभागी करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

शहरातील विविध बचत गटांच्या प्रमुखांशी संपर्क साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणे आणि त्या समस्या शासनाकडे संघटितपणे मांडण्याचेही ठरले. अध्यक्षीय भाषणात मयुरी जाधव यांनी महिलांनी बचतीची सवय लावून बचत गटांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केले. महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याचे आवाहन करून, प्रत्येक पात्र महिलेला योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## निष्ठेत कसूर नको




स्वामीजींकडे एकदा दोन तरुण आले. मला तुमचा शिष्य करून घ्या. म्हणाले, स्वामी काहीच बोलले नाहीत. डोळे बंद ते दोघे कंटाळले. निघून गेले. पुन्हा दुसऱ्या दिवशी आले. तसेच म्हणाले. स्वामीही तसेच वागले. ते कंटाळले. निघून गेले. पुन्हा दुसऱ्या दिवशी आले. तसेच म्हणाले. स्वामीही असेच वागले. ते कंटाळले. निघून गेले. तिसऱ्या दिवशी एकाने फुले आणली. स्वामींची पूजा केली. स्तोत्रे म्हटली. दुसऱ्याने मात्र राग व्यक्त केला. माणूसकी नाही तुमच्यात. म्हणून तो शिविगाळ करू लागला. स्वामीजी तरीही गप्पच. दोघेही पुन्हा कंटाळले. निघून गेले. रोज हाच प्रकार चाले. एक पूजा करी, तर दुसरा शिवीगाळ, पण स्वामी आपले गुपचुप. दोघेही येण्याचे थांबवेनात. मी स्वामींचा शिष्य होणारच, असे दोघेही म्हणायचे. मग इतरांनी सागितले. स्वामीजीं एका वेळी एकालाच शिष्य म्हणून स्वीकारतात. तुम्ही एकाच वेळी व्यर्थ शिणताहात.

पूजाकर्मी म्हणाला, स्वामीजी मलाच स्वीकारणार. मग दुसऱ्या शिवराळ तरुणाला राग आला. तो ओरडला. मलाच शिष्य म्हणून स्वीकारायला हवं स्वामीनी. मीच लायक आहे शिष्य होण्यासाठी. स्वामीजी मात्र डोळे मिटून गप्पच असायचे.

एक दिवस खूप पाऊस आला. नदीला प्रचंड पूर आला. पूजा करणारा तरुण पलीकडच्या काठावरच नाइलाजाने अडला. त्याने तेथूनच पुजा करण्याचा व स्तोत्रे गाण्याचा नेम पूर्ण केला. दुसरा शिवराळ मात्र पुरात उडी मारून जिवाची पर्वा न करता स्वामींच्या आश्रमात पोहून आला. नित्यनेमानुसार रागाच्या भरात अर्वाच्य बोलून परत गेला. पाऊस सतत तीन दिवस पडला. तिन्ही दिवस नदीला प्रचंड पूर होता. पूजाकर्मी तरुण पूजेला चुकला नाही. नदीच्या पलीकडच्या काठावरुनच तो पूजा करी. स्तोत्रे म्हणे. हा दुसरा मात्र नेम पाळण्यात कुचराई न करी. जीव धोक्यात घालून पुरात उडी घेई. पोहून स्वामींकडे जाई. अद्वातद्वा बोलून परत येई.

चौथ्या दिवशी दोघेही तरुण पुन्हा स्वामींकडे पोहोचले. स्वामींनी त्यादिवशी डोळे उघडले. अद्वतदा बोलणाऱ्या शिवराळ तरुणाला आपला शिष्य त्यानी पत्करले. शिव्या द्यायला का होईना, पण माझ्याकडे येण्याची तुझी निष्ठा मोलाची आहे. निष्ठा हवी. तामसी वृत्ती बदलता येईल. पण प्रसंगी कच खाणारी निष्ठा शिष्याला अपात्र ठरवील. असे ते म्हणाले.

निष्ठेमध्ये कधी कसूर करू नये. भयंकर पूर वा भय पायाशी त्यात मागे न हाटवे. कर्तव्यात कधी न चुकावे. एकदा एक अंगीकारले, की प्राण गेले तरी ते टाकू नये. भरभराट होवो वा दारिद्य येवो, मन कच खाऊन कर्तव्यापासून च्युत न होवो. हीच संताची पांडुरंगापाशी निष्ठा. मग शिव्यांचा वर्षावदेखील पांडुरंगाला भावतो. संत जनाबाई विठ्ठलास म्हणाल्या, तुझे गेले मढे तुला पाहून काळ रडे । उभी राहुनी अंगणी । शिव्या देत दासी जनी ।।

माया भरली संसारात, तिच्यामुळे संताप होतो मनात. पांडुरंग भावत नाही, याचा राग भरतो शब्दात. मग शिव्या येतात ओठात, पण निष्ठा असते पोटात. मग पांडुरंगालाही आवडतात शिव्या. हसतो तो गालात. कर्तव्यात चुकू नये निष्ठा कधी ढळू नये.

**– किशोर गांधी**

# ध्वनी प्रदूषणाविरोधातील प्रबोधनाची दखल

## प्रा.अमोल खाडे यांना 'युवा सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' जाहीर



नगर – आधार बहुउद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्थेच्या वतीने यंदाचा 'युवा सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार' प्रा. अमोल बाबासाहेब खाडे यांना जाहीर करण्यात आला आहे.

ध्वनी प्रदूषणाविरोधात सातत्याने केलेल्या जनजागृती व प्रबोधनात्मक कार्याची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

संस्थेचे अध्यक्ष सुदाम विलास लगड यांनी प्रा. अमोल खाडे यांना पत्राद्वारे पुरस्कार निवडीची माहिती दिली. डिसेंबर २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

ध्वनी प्रदूषणामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होणारे विविध परिणाम, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या तसेच ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत प्रा. खाडे यांनी विविध माध्यमांतून जनजागृती केली आहे. समाजामध्ये ध्वनी प्रदूषणाच्या दुष्परिणामांविषयी जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

# बालक मंदिर महिला मंडळ शाळेत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



बालक मंदिर महिला मंडळ शाळेत मनपाच्यावतीने विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

नगर – बालक मंदिर महिला मंडळ शाळेत २८ सप्टेंबर रोजी मनपाच्या वतीने विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

अहिल्यानगर महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या प्रमुख डॉ. सौ. संपदा मिरीकर व त्यांच्या सहकारी यांनी तपासणी केली. त्यांनी विद्यार्थ्यांची दंत तपासणी व नेत्र तपासणी, जंत तपासणी आणि सर्व आरोग्य तपासणी केली. तसेच सिटीझन असोसिएशन फॉर चाईल्ड राईट या संस्थेतर्फे निमिया मेडिटेशन प्रोग्राम अंतर्गत संस्थेचे यश राऊत व त्यांच्या सहकाऱ्यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी केली. हिमोग्लोबिन कमतरता असलेल्या विद्यार्थ्यांना आयर्न, कॅल्शियम व फॉलिक ॲसिडच्या गोळ्या देण्यात आल्या तसेच त्यासंबंधी आहार मार्गदर्शन करण्यात आले. पालकांमध्ये व समाजात यासंबंधी जाणीव जागृती निर्माण होण्यासाठी पत्रक देण्यात आले.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.अस्मिता शूळ यांनी डॉ. सौ. संपदा मिरीकर तसेच सी.ए.एफ.सी.चे यश राऊत यांचे शाळेच्या वतीने आभार मानले.

# देशपांडे हॉस्पिटल क्लॅरिटी आय केअर येथे २ ऑक्टोबरला मोफत नेत्र तपासणी शिबीर



डॉ. हितेशी जैन

नगर – शहरातील आनंदी बाजार येथील देशपांडे हॉस्पिटल आणि क्लॅरिटी आय केअर येथे २ ऑक्टोबर रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत हे शिबिर होणार आहे. अनुभवी नेत्ररोगतज्ज्ञ व रेटिना सर्जन डॉ. हितेशी जैन या रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

मोतीबिंदू आणि मधुमेहामुळे होणारे डोळ्यांच्या पडद्याचे विकार (डायबेटिक रेटिनोपॅथी) ही दृष्टी कमी होण्याची प्रमुख कारणे असतात. शिबिरात यांवर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल. रुग्णांची सर्वसमावेशक नेत्र तपासणी करण्यात येईल आणि तपासणीच्या निष्कर्षांनुसार योग्य उपचारांचा सल्ला दिला जाईल. हॉस्पिटलमध्ये नेत्र तपासणी व उपचारांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यामुळे दृष्टीदोष असलेल्यांना लवकर दिलासा मिळण्यास मदत होते. शिबिरात सहभागी रूग्णांच्या रक्तातील साखरेची तपासणी ५० टक्के सवलतीत केली जाईल. तसेच पुढील उपचारांसाठी आवश्यक इतर तपासण्या सवलतीच्या दरात केल्या जातील. लवकर निदान आणि वेळेवर उपचार केल्यास दृष्टी जपण्यास मदत होऊ शकते.

मोतीबिंदू तपासणी किंवा मधुमेहामुळे होणाऱ्या रेटिनोपॅथीचे निदान व उपचार यांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या रूग्णांनी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क : ८०८०४ ९६१२२.




प्रल्हाद पाठक व शैलेश साबळे यांना 'उत्कृष्ट अभियंता पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

# प्रल्हाद पाठक व शैलेश साबळे यांना 'उत्कृष्ट अभियंता पुरस्कार' प्रदान

शेवगाव – महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट अभियंता पुरस्कार २०२६ शेवगाव सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता प्रल्हाद अनंत पाठक व कनिष्ठ अभियंता शैलेश विष्णू साबळे यांना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते व राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांचे प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. २९ सप्टेंबर रोजी मुंबई येथे समारंभ झाला.

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्मदिवस दरवर्षी अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने निवडक अभियंत्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने वैयक्तिक उत्कृष्ट अभियंता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. गौरव चिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अभियंता पाठक व कनिष्ठ साबळे यांनी शेवगाव उपविभागात रस्ते, इमारती व पुलांची कामे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार व गुणवत्तेने केल्याने त्यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव (रस्ते) शरद राजभोग, सचिव (बांधकामे) आबासाहेब नागरगोजे तसेच प्रशांत औटी (सचिव प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजना), अरुंधती शर्मा (मुख्य अभियंता (सा.बां.प्रादेशिक विभाग नाशिक), विवेक माळुंदे (अधिक्षक अभियंता अहिल्यानगर), लक्ष्मीकांत जाधव व युवराज कोकरे (कार्यकारी अभियंता अहिल्यानगर) व मुख्य अभियंता, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# अहिल्यानगर शहरामध्ये ३ आणि ४ ऑक्टोबर रोजी आयएमए वुमन्स डॉक्टर विंगचे राज्यस्तरीय परिषद

नगर – महिला डॉक्टरांच्या वैद्यकीय, सामाजिक आणि तांत्रिक क्षेत्रातील योगदानाला गती देण्यासाठी 'इंडियन मेडिकल असोसिएशन वुमन्स डॉक्टर्स विंग' च्या वतीने ३ आणि ४ ऑक्टोबर रोजी अहिल्यानगर येथे राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. पॉईज, पर्पज अँड प्रोग्रेस या घोषवाक्यासह परंपरा जपत आधुनिकतेचा वेध घेणे ही या परिषदेची मुख्य संकल्पना आहे. या राज्यव्यापी अधिवेशनासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून ४०० हून अधिक महिला डॉक्टर्स उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या परिषदेचे उद्‌घाटन ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता अरणगाव रोड येथील सोलिटेअर बाय बडी साजन येथे पार पडणार आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून आय. एम. ए. चे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी, डॉ. मंजुषा गिरी आणि डॉ. सुजय विखे पा. उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

वैद्यकीय क्षेत्रात 'AI' आणि जेन झी'वर मंथन केले जाणार आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत केवळ वैद्यकीय विषयांवरच नव्हे, तर बदलत्या काळाची पावले ओळखून विविध महत्त्वपूर्ण विषयांवर परिसंवाद व चर्चासत्रे आयोजित करण्यात आली आहेत. यामध्ये स्त्री–आरोग्य, वैद्यकीय क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता चा वापर आणि 'जेन झी' (Gen Z – आजची तरुण पिढी) यांच्याशी संबंधित आरोग्य व मानसिकतेवर तज्ज्ञ डॉक्टरांचे विचारमंथन होणार आहे.

परिषदेच्या यशस्वीतेसाठी EVECON 2026 या परिषदेच्या अध्यक्षा डॉ. ज्योत्स्ना डौले, सचिव डॉ. सुमा वाघ व डॉ. प्रीती डूंगरवाल, डॉ. सोनल बोरुडे, परिषदेच्या मुख्य आयोजक डॉ. रेणुका पाठक, उपाध्यक्ष डॉ. संगीता कांडेकर व डॉ. पद्माकांती कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले.

आय. एम. ए. WDW च्या अध्यक्ष डॉ. मंजिरी झेंडे, डॉ. क्रांती खालकर, डॉ. सुजाता नरवडे, डॉ. नीलम बागल आणि डॉ. मेघना पाटणकर यांनी परिषदेबद्दल सविस्तर माहिती दिली. डॉक्टरांनी या परिषदेला उपस्थित राहावे, असे आवाहन केले.

या परिषदेला आय. एम. ए.चे ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. निसार शेख, डॉ. धनंजय कुलकर्णी व डॉ. अमित करडे यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी, औषधोपचार व आरोग्य साहित्याचे वाटप

**सफाई कर्मचारी हेच शहराचे खरे आरोग्यदूत : महापौर ज्योतीताई गाडे**



महानगरपालिकेच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत सफाई कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार व आरोग्य साहित्याचे वाटप करण्यात आले (छायाचित्र – लहू दळवी

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना औषधोपचार व आरोग्य साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट सफाई कर्मचारी पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे व आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वच्छता दूत सुरेश खामकर, डॉ. अमोल बागुल, घनकचरा विभागाचे प्रमुख रामदिन यांच्यासह डॉक्टर, अधिकारी व सफाई कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, सफाई कर्मचारी हे शहरातील नागरिकांचे खऱ्या अर्थाने आरोग्यदूत आहेत. ऊन, वारा, पाऊस यांची पर्वा न करता ते पहाटेपासून शहराच्या स्वच्छतेचे काम करतात. त्यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहण्यास मोठी मदत होते. शहराची स्वच्छता राखणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्यही सुदृढ व निरोगी राहणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी तसेच मोफत औषधोपचार करण्यात आले आहेत. सफाई कर्मचारी निरोगी राहिले तर त्याचा सकारात्मक परिणाम शहरातील नागरिकांच्या आरोग्यावरही होईल. त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, महानगरपालिकेत सुमारे ७०० सफाई कर्मचारी काम करीत असून, शहराच्या स्वच्छतेवर सुमारे ९ कोटी रुपये खर्च होत आहेत. आपण काम करीत असताना शहराच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देऊन नागरिकांचे समाधान होणे गरजेचे आहे. स्वच्छता विभागाला अजूनही स्वच्छतेच्या कामावर मोठ्या प्रमाणात लक्ष द्यावे लागणार आहे. यासाठी प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याने १०० टक्के योगदान द्यावे. कामामध्ये कामचुकारपणा करू नये. महानगरपालिका संस्थेबाबत प्रामाणिकपणा ठेवून प्रत्येक कर्मचाऱ्याने आपले कर्तव्य पार पाडावे. सफाई कर्मचारी घाणीत जाऊन काम करीत असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी महापालिकेच्या माध्यमातून वर्षातून दोन वेळा आरोग्य तपासणी केली जाते. तसेच आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक साहित्याचे वाटपही केले जाते, असे डांगे यांनी सांगितले.

महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात व्यसनाचे प्रमाण असल्याचे तसेच काही कर्मचारी खासगी सावकारांकडून व्याजाने पैसे घेत असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी नमूद केले. खासगी सावकारांकडून कर्ज घेतल्यानंतर काही वेळा कर्मचाऱ्यांकडून बँकेचे पासबुक किंवा क्रेडिट कार्ड ताब्यात घेतले जाते आणि पगार झाल्यानंतर व्याजासह रक्कम काढून घेतली जाते. त्यामुळे कर्मचारी आर्थिक संकटात व कर्जबाजारीपणात सापडतो. त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांनी व्यसनापासून तसेच खासगी सावकारांकडून कर्ज घेण्यापासून दूर राहावे. गरज असल्यास महापालिका कर्मचारी पतसंस्था किंवा बँकेकडून कर्ज घ्यावे. खासगी सावकारीच्या मार्गाला जाऊ नये, असे आवाहन आयुक्तांनी केले.

शहरातील मुख्य रस्त्यांवर ठिकठिकाणी कचरा फेकलेला दिसतो. हा कचरा सफाई कर्मचाऱ्यांनी पोत्याद्वारे गोळा करून एका ठिकाणी जमा करावा आणि घंटागाडीच्या माध्यमातून तो उचलण्यात यावा. सफाई कर्मचाऱ्यांनी दोन सत्रांमध्ये काम करावे, जेणेकरून २४ तास शहर स्वच्छ दिसण्यास मदत होईल. आपले शहर छोटे असून ते स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी सर्वांची आहे. त्यामुळे प्रत्येक सफाई कर्मचाऱ्याने आपले कर्तव्य जबाबदारीने पार पाडावे, असेही आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांची एक्स–रे, रक्तदाब, शुगर आणि रक्त तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार मोफत औषधोपचार व औषधांचे वाटप करण्यात आले. या आरोग्य शिबिराचा सफाई कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.

आयुक्त यशवंत डांगे यांनी स्वतः जातीने लक्ष देत सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीची पाहणी केली. ते थेट सफाई कर्मचाऱ्यांमध्ये जाऊन त्यांची विचारपूस करीत होते. यावेळी सफाई कर्मचाऱ्यांमध्ये आयुक्तांसोबत छायाचित्र काढण्यासाठी उत्साहाचे वातावरण दिसून आले. आयुक्त डांगे यांनीही यावेळी स्वतःच्या आरोग्याची तपासणी करून घेतली.

शिबिराच्या निमित्ताने महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे आणि सफाई कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. आपले शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित ठेवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. नागरिकांच्या आरोग्यासाठी स्वच्छता महत्त्वाची असून, शहर स्वच्छ ठेवण्यामध्ये सफाई कर्मचारी आणि नागरिक या दोघांचीही भूमिका महत्त्वाची असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.



२० व्या राज्यस्तरीय ज्युनियर बेसबॉल क्रीडा स्पर्धेत अजिंक्यपद विजेते ठरलेले अमरावती जिल्ह्याचे खेळाडू. (छायाचित्र – अमित मन्यार)

# राज्यस्तरीय ज्युनियर बेसबॉल क्रीडा स्पर्धेत अमरावती जिल्हा ठरला अजिंक्यपद विजेता

नगर – महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशन व अहिल्यानगर जिल्हा बेसबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जिल्हा क्रीडा कार्यालय अहिल्यानगर यांच्या सहकार्याने '२० वी राज्यस्तरीय ज्युनियर बेसबॉल क्रीडा स्पर्धा २०२६–२७' चे आयोजन साईदीप हिरोज क्रिकेट अॅकॅडमी, नक्षत्र लॉन जवळ, बुरुडगाव रोड, जुना वाकोडी रस्ता, अहिल्यानगर येथे २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान करण्यात आले होते. आज या राज्यस्तरीय स्पर्धेचा सोहळ्यात समारोप झाला. या स्पर्धेमध्ये राज्यातील तब्बल २७ जिल्ह्यांनी सहभाग नोंदविला असून एकूण ४३२ खेळाडू सहभागी झाले होते. सर्व सामने ५–५ इनिंगचे खेळवण्यात आले.

या स्पर्धेचा अंतिम सामना (प्रथम व द्वितीय क्रमांक) अमरावती विरुद्ध कोल्हापूर जिल्हा या दोन संघांमध्ये रंगला. या सामन्यात अमरावती संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत ११–० अशा मोठ्या फरकाने कोल्हापूरचा पराभव केला आणि अजिंक्यपद पटकावले, तर कोल्हापूर जिल्ह्याला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. तसेच तृतीय क्रमांकासाठी अहिल्यानगर व रायगड यांच्यात अटीतटीची लढत झाली. यामध्ये यजमान अहिल्यानगर संघाने १३–९ असा विजय मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला.

या प्रसंगी महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशनचे महासचिव राजेंद्र इखनकर, उपाध्यक्ष इंद्रजीत नितनवार, सहसचिव म करंद कोन्हाळकर, खजिनदार दिपेन वाळके, टेक्निकल कमिटी चेअरमन अशोक सरोदे, अहिल्यानगर जिल्हा बेसबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अरुण चंद्रे, उपाध्यक्ष सुधीर चपळगावकर, सहसचिव कल्पेश भागवत तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे उपस्थित होते. त्याचबरोबर अहिल्यानगर जिल्हा ऑलिम्पिक असोसिएशनचे सचिव शैलेश गवळी व क्रीडा मार्गदर्शक रेवनात शेलार यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

या स्पर्धेत सोमनाथ सपकाळ, सोमनाथ नलावडे, आकाश साबणे, रेखा धनगर, आरती भगत, सायमा बागवान, रितू फ्रान्सिस, धनंजय शिरसाठ, विकी सायरसे, साक्षात धनगर, श्रीकांत सकपाळ, वैष्णवी फलके, केदार दिव्या व प्रथमेश गावडे यांनी पंच म्हणून अत्यंत निपक्षपातीपणे काम पाहिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशनचे सहसचिव मकरंद कोन्हाळकर यांनी केले. सूत्रसंचालन अहिल्यानगर बेसबॉल असोसिएशनचे सहसचिव कल्पेश भागवत यांनी केले. अहिल्यानगर जिल्हा बेसबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष सुधीर चपळगावकर यांनी आभार मानले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी हरी सानप, सागर कावळे, आकाश शिंदे, राहुल खाडे, आशिष मेहत्रे व उमेश वाघुले यांनी परिश्रम घेतले.

# 'श्रीरामकृष्ण'च्या विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धेत सुयश

नगर – श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन व मोहनलाल रामअवतार मानधन कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध आंतरशालेय स्पर्धेत सहभागी होत उत्तम यश संपादन केले आहे.

श्री शारदा इंग्लिश मीडियम शाळा कोपरगाव आयोजित राज्यस्तरीय हिंदी वक्तृत्व स्पर्धेत चैताली महादेव चौगुले व शिवानी सचिन मोरे यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. (५००० रुपये रोख, सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्रक) प्राप्त केले. यामध्ये एकूण ४० शाळा व ८० विद्यार्थी सहभागी झाले होते.



श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशन व मोहनलाल रामअवतार मानधन कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध आंतरशालेय स्पर्धेत सहभागी होत उत्तम यश संपादन केले आहे.

ज्ञानसंपदा इंग्लिश मीडियम स्कूल आयोजित संस्कृत स्तोत्र पाठांतर स्पर्धेत आर्या विजय पांडे प्रथम पारितोषिक (सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्रक) नियती धीरज सुराणा द्वितीय पारितोषिक (सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) स्वरा योगेश्वर व्यास प्रथम क्रमांक (सन्मान चिन्ह आणि प्रशस्तीपत्रक) नक्षत्रा विशाल कोंडरा द्वितीय पारितोषिक (सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्रक) सर्वात जास्त बक्षीस आहे शाळेला मिळाल्यामुळे उत्कृष्ट कामगिरीचे सन्मानचिन्हही शाळेला देण्यात आले आहे.

अहमदनगर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आंतरशालेय व अंतर महाविद्यालयीन रूथबाई हिवाळे वक्तृत्व स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. चैताली चौगुले प्रथम क्रमांक (३००० रुपये रोख, प्रशस्तीपत्रक व सन्मान चिन्ह), भगवती सोपान उबाळे (४००० रुपये रोख, प्रशस्तीपत्रक व सन्म ानचिन्ह), निहारिका महेश मंगलारप तृतीय क्रमांक (३००० रुपये रोख, प्रशस्तीपत्रक व सन्मान चिन्ह), रोशनी रोहिदास लोखंडे (उदयोन्मुख महिला तारा,१५०० रुपये रोख, व प्रशस्तीपत्रक) याने तिचा गौरव करण्यात आला.

अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम शाळेने आयोजित केलेल्या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत चैताली चौगुले व आरुष बेडेकर यांनी यश प्राप्त केले. (३०१ रुपये रोख प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह प्राप्त) तसेच फिरत्या चषकांनेही त्यांना गौरविण्यात आले. आंतरशालेय हिंदी वादविवाद स्पर्धेत चैताली चौगुले (सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक व रोख ३५१ रुपये प्राप्त) व शिवानी सचिन मोरे हिला उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक (सन्मान चिन्ह, प्रशस्तीपत्रक व २०० रुपये प्राप्त) अशा विविध स्पर्धांमध्ये वरील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यालयाच्या प्राचार्या गगन वाधवा या विद्यार्थ्यांना नेहमीच प्रोत्साहित करतात.

संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष नंदकुमार झंवर, मोहनलाल मानधना, राजेश झंवर, सचिव डॉक्टर शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. तसेच उपप्राचार्या संपदा देशपांडे, समन्वयक सुषमा उजागरे, श्रेयकुमार गुंडू, प्रांजली भोसले यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. वरील विद्यार्थ्यांना रोथेल लोंढे, उमा जोशी, मुग्धा देवकर यांनी मार्गदर्शन केले.

# अहिल्यानगरमध्ये २ ऑक्टोबरला 'जिनेश्वर अधिवेशन'

## देशभरातून २५०० हून अधिक आराधक येणार



नगर – आचार्य भगवंत १००८ आनंदऋषिजी म.सा. यांच्या पावन पुण्यभूमीत, प्रवर्तक कुंदनऋषिजी म.सा. तसेच उपाध्याय भगवंत प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या पावन उपस्थितीत २ ऑक्टोबर रोजी जिनेश्वरी अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. भगवान महावीरांनी संपूर्ण मानवजातीला दिलेला अहिंसा, संयम, आत्मजागृती आणि आत्मकल्याणाचा संदेश प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचावा, प्रत्येक घरात जिनवाणीचा मंगल नाद घुमावा आणि प्रत्येक हृदयात प्रभू महावीरांच्या विचारांची ज्योत प्रज्वलित व्हावी, हा या उपक्रमामागील पवित्र भाव आहे.

### घर–घर महावीर – हर घर महावीर

प्रभु महावीरांचे अंतिम वचन, त्यांची दिव्य वाणी आणि आत्मकल्याणाचा मार्ग केवळ काही व्यक्तींपुरता मर्यादित न राहता घरोघरी आणि जनमानसापर्यंत पोहोचावा, या मंगल संकल्पातून जिनेश्वरी आराधनेचा हा उपक्रम साकार होत आहे. जगातील प्रत्येक प्राणी दुःखातून मुक्त व्हावा, प्रत्येक जीवाला आत्मशांतीचा मार्ग मिळावा आणि प्रत्येक जीव आपल्या अंतरंगातील परमात्मस्वरूपाची अनुभूती घेऊ शकेल या उदात्त भावनेतून हा संकल्प पुढे नेला जात आहे.

उपाध्याय भगवंत प्रवीणऋषिजी म.सा. यांच्या प्रेरणा, मार्गदर्शन आणि संकल्पनेतून जिनेश्वरी आराधनेचा हा पवित्र प्रवाह अधिकाधिक घरांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सुरू आहे. या मंगल कार्यासाठी आज २५०० पेक्षा अधिक जिनेश्वरी आराधक भारतभर कार्यरत असून, जिनवाणीचा प्रकाश अधिकाधिक परिवारांपर्यंत पोहोचविण्यासाठी समर्पित भावनेने सेवा देत आहेत. या सर्व जिनेश्वरी आराधकांच्या उपस्थितीत आणि त्यांच्या सामूहिक साधना–आराधनेतून विराट जिनेश्वरी अधिवेशन होत आहे.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज साहेब यांच्या पुण्य कर्म भूमीत महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराजसाहेब तसेच उपाध्याय भगवंत प्रवीणऋषीजी महाराज साहेब यांचा पावन सानिध्यात २ ऑक्टोबर गांधी जयंती दिनी जिनेश्वरी अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे

या कार्यक्रम राजस्थान तमिलनाडु कर्नाटक मध्य प्रदेश अशा भारतातील अनेक राज्यातील २१०० हुन जास्त आराधक अहिल्यानगरी इथा अधिवेशन साठी येत आहेत हा केवळ एक कार्यक्रम नसून, जिनवाणीशी जोडले जाण्याचा, प्रभु महावीरांच्या विचारांना जीवनात उतरविण्याचा आणि आत्मकल्याणाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकण्याचा हा एक मंगल आध्यात्मिक सोहळा आहे. सकाळी ८ वाजता आनंदधाम येथून शोभा यात्रा निघुन आनंदतीर्थ समवशरण पर्यंत निघनार आहे. या आराधकांच्या आराधनाचा सोहळा अभूतपूर्व सोहळा दुपारी दीड ते साडेचार या वेळेत होणार असून या सोहळ्याला पाहण्यासाठी भक्तांनी यावे असे आमंत्रण चातुर्मास समिती तर्फे करण्यात येत आहे.

कार्यक्रम २ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत होईल. माहितीसाठी आनंद समवशरण, आनंदधाम समर्पण चातुर्मास समिती – अहिल्यानगर, चातुर्मास प्रमुख लाभार्थी – सौरभ बोरा., जिनेश्वरी पारायण / आराधना हेतु संपर्क : उल्का सोलंकी ९२७०९४२७३७, मीना पितळे ८८३०६८१५५१, अंजु भंडारी – ८३२९९२२०८३, सारीका भंडारी – ९५४५५५५११८

# गणेशोत्सव उत्कृष्ट आरास स्पर्धेचे २ ऑक्टोबरला परितोषिक वितरण

## विचार भारती, चंद्रा एजन्सीज् व बन्सीमहाराज यांचे संयुक्त आयोजन

नगर – विचार भारती, चंद्रा एजन्सीज व बन्सीमहाराज यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवात घेण्यात आलेल्या उत्कृष्ट सार्वजनिक व घरगुती आरास स्पर्धेचे परितोषिक वितरण २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सकाळी ९:३० वाजता सावेडीच्या माऊली सभागृहात होणार आहे. यावेळी विजेत्या गणेश मंडळांना व उत्कृष्ट घरगुती देखाव्यांना पारितोषिकांनी सन्मानित करण्यात येणार आहे.

अयोध्येच्या श्रीराम मंदिर न्यासाचे महासचिव गोविंददेवगिरी महाराज यांच्या हस्ते हा पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे. महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रम ास प्रमुख पाहुणे उपमहापौर धनंजय जाधव, प्रमुख उपस्थिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे व उद्योजक पेमराज बोथरा आदी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती विचार भारतीचे अध्यक्ष सुधीर लांडगे यांनी दिली

परितोषिक वितरण समारंभात गोविंददेवगिरी महाराज यांचे भारतीय उत्सव : काल, आज व उद्या या विषयावर व्याख्यान व आशीर्वचन होणार आहे. या समारंभात शहरातील सर्व ढोल पथकांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे, या कार्यक्रमास अहिल्यानगर शहरातील सर्व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी व ढोल पथकांमधील वादकांनी सदस्यांसह उपस्थित राहण्याचे आवाहन स्पर्धा प्रमुख रवींद्र बारस्कर यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे नियोजन बन्सीमहाराजचे संचालक राजकुमार जोशी, चंद्रा एजन्सीजचे संचालक हेमंत नेवासकर व मिलिंद नेवासकर, सहउपक्रम प्रमुख राहुल जामगावकर, अनिकेत कौर, संपत नलावडे, सुनिल नागोरी, अमित खामकर आदींसह विचार भारतीचे पदाधिकारी करत आहेत.




संत सावतामाळी पतसंस्थेच्या वार्षिक सभेत बोलताना संस्थापक प्रा. देवराम शिंदे.

# श्री संत सावतामाळी पतसंस्थेला १ कोटी ७७ लाखांचा ढोबळ नफा

नगर – अहिल्यानगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील श्री संत सावतामाळी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेने मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात १ कोटी ७७ लाख रुपयांचा ढोबळ नफा मिळवत नेत्रदीपक कामगिरी केली आहे.

संस्थेची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २७ सप्टेंबर रोजी संस्थापक प्रा. देवराम मुरलीधर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व रमेश भाऊराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली श्री संत सावतामाळी मंदिर येथे झाली. संस्थापक प्रा. देवराम मुरलीधर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने प्रगतीची नवी शिखरे गाठली. यावर्षी वार्षिक उलाढाल २२८ कोटी ७१ लाखांवर पोहोचली असून, गेल्या वर्षीपेक्षा नफ्यात ६० लाख रुपयांची वाढ झाली आहे. निव्वळ नफा २६ लाख २१ हजार रुपये आहे. यावेळी ज्येष्ठ संचालक दत्तात्रय आसाराम भोंदे यांनी संस्थेच्या प्रगतीवर अभिमान व्यक्त केला. सभेत वैभव श्रीकांत सदावर्ते यांनी अहवाल वाचन केले. तसेच सभासदांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा चषक, प्रशस्तीपत्रक व रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला.

# अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या चेअरमनपदी प्रकाश राठी, व्हा. चेअरमनपदी विष्णू फुलसौंदर

नगर – अहमदनगर जिल्हा नागरीसहकारीबँकअसोसिएशनच्या चेअरमनपदी प्रकाश राठी, तर व्हाईस चेअरमनपदी विष्णू फुलसौंदर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. असोसिएशनच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवडणूक सहाय्यक निबंधक सुभाष कराळे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यावेळी असोसिएशनचे सर्व संचालक उपस्थित होते.



अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या चेअरमनपदी प्रकाश राठी व व्हाईस चेअरमनपदी विष्णू फुलसौंदर यांची निवड करण्यात आली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

चेअरमन पदासाठी वसंत गुंड यांनी प्रकाश राठी यांच्या नावाची सूचना मांडली. त्यास आशा मिस्कीन यांनी अनुमोदन दिले. तसेच व्हाईस चेअरमन पदासाठी संजय बोरा यांनी विष्णू फुलसौंदर यांच्या नावाची सूचना मांडली, तर त्यास श्रीकांत तिरसे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर दोन्ही पदांवर संबंधितांची निवड हि बिनविरोध जाहीर करण्यात आली.

नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रातील विविध प्रश्न, अडचणी आणि संस्थांच्या हिताच्या विषयांवर संघटितपणे काम करण्याची महत्त्वाची जबाबदारी व्हाईस चेअरमन विष्णू फुलसौंदर यांच्यावर आली आहे. सहकारी बँकिंग क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी संचालक मंडळाच्या सहकार्याने प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. नागरी सहकारी बँकांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या बाबी संघटनेच्या माध्यमातून पुढे नेण्यास प्राधान्य देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

चेअरमन प्रकाश राठी यांनीही संचालकांच्या सहकार्याने असोसिएशनच्या माध्यमातून नागरी सहकारी बँकांच्या हितासाठी काम करण्याची भूमिका व्यक्त केली. सहकारी क्षेत्रातील संस्थांमध्ये समन्वय वाढवून विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले.

यावेळी मावळते चेअरमन सत्येन मुंदडा यांनी त्यांच्या कालावधीतील कामकाजाचा आढावा घेतला आणि नवनिर्वाचित चेअरमन व्हाईस चेअरमन यांना त्यांच्या निवडीबद्दल शुभेच्छा दिल्या.

यावेळी संचालक सत्येन मुंदडा, वसंत गुंड, आशा मिस्कीन, संजय बोरा, श्रीकांत तिरसे, भाऊसाहेब राहींज, सिताराम झिने, अशोक शेळके यांच्यासह पुनम बुरा, विलास काकडे आदी उपस्थित होते.

# गुणांपलीकडचे मुलांमध्ये शिक्षण घडविण्याचे शिक्षकांना धडे; चित्रकुट इंटरनॅशनल स्कूलमध्ये कार्यशाळा



नगर – विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्याऐवजी त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष जीवनातील कौशल्ये, सर्जनशीलता, आत्मविश्वास, स्वावलंबन आणि श्रमाची प्रतिष्ठा रुजविण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर शहरातील चित्रकूट इंटरनॅशनल स्कूल येथे शिक्षकांसाठी 'कौशल बोध' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कौशल्याधारित आणि अनुभवाधारित शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याबाबत या कार्यशाळेत शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. हे अधिकृत प्रशिक्षण सीबीएसईच्या स्किल एज्युकेशन युनिट, दिल्लीकडून आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी अशोक सचदेव यांची स्किल एज्युकेशन युनिटचे मास्टर ट्रेनर म्हणून नियुक्ती करण्यात आली होती आणि सीबीएसईच्या वतीने त्यांनी हे प्रशिक्षण आयोजित करून घेतले. 'कौशल बोध' हा विषय यावर्षीपासून इयत्ता ६वी, ७वी आणि ८वीसाठी अधिकृतपणे अनिवार्य करण्यात आला आहे.

या कार्यशाळेसाठी श्रीमती स्वेक्षणा मित्रा आणि अशोक सचदेव यांनी मास्टर ट्रेनर म्हणून मार्गदर्शन केले. शिक्षकांचा सक्रिय सहभाग घेऊन विविध कृती, अनुभवाधारित उपक्रम, संवाद आणि चर्चांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यविकासाची प्रक्रिया अधिक परिणामकारक पद्धतीने कशी राबविता येईल, याचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा केंद्रबिंदू केवळ परीक्षेतील गुण किंवा पाठ्यपुस्तकातील ज्ञान न राहता, त्यांना भविष्यातील आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्यास सक्षम करणे आवश्यक असल्याचे कार्यशाळेत अधोरेखित करण्यात आले. दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशील विचार, निर्णयक्षमता, संवादकौशल्य, सहकार्याची भावना, स्वावलंबन आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव या बाबी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे सांगण्यात आले.

कार्यशाळेत मार्गदर्शन अशोक सचदेव म्हणाले की, शिक्षणाचा अंतिम उद्देश केवळ चांगले गुण मिळवणे नसून विद्यार्थ्यांना जीवनातील विविध आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्यास सक्षम बनविणे हा आहे. कौशल्य हे केवळ रोजगार मिळविण्याचे साधन नसून आत्मनिर्भरता आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा भक्कम पाया आहे. आजच्या बदलत्या काळात विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता त्यांना जीवनोपयोगी कौशल्यांचे शिक्षण देणे आवश्यक आहे. "Learning for Marks'पासून "Learning for Life'कडे शिक्षणाचा प्रवास घडविण्यासाठी शाळांमध्ये कौशल्याधारित व अनुभवाधारित शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी गरजेची असल्याचे कार्यशाळेत त्यांनी स्पष्ट केले.

श्रीमती स्वेक्षणा मित्रा म्हणाल्या की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध कृतींमध्ये सहभागी करून घेत त्यांच्यातील सुप्त गुण आणि कौशल्ये ओळखणे, त्यांना प्रोत्साहन देणे तसेच प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्याबरोबरच स्वतंत्रपणे विचार करण्याची आणि समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेस अहिल्यानगर सहोदयच्या सचिव सौ. नम्रिता ओहरी तसेच अहिल्यानगर शहर समन्वयक श्रीमती जयश्री म्हेत्रे यांची विशेष उपस्थिती लाभली. 'हुनर आहे, तर कदर आहे; कौशल्य आहे, तर आत्मविश्वास आहे आणि कुशल विद्यार्थी म्हणजे विकसित भारताची मजबूत पायाभरणी,' असा प्रेरणादायी संदेश कार्यशाळेतून देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणामध्ये कौशल्य, अनुभव आणि प्रत्यक्ष कृती यांचा समावेश करण्याचे आवाहन करण्यात आले.

ही कार्यशाळा सेक्शन ऑफिसर – सीओई, सीबीएसई सौ. पल्लवी माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. याबद्दल सीबीएसईच्या कौशल्य शिक्षण विभागाचे विशेष आभार मानण्यात आले.

# धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस शिक्षा आणि दंड

नगर – येथील मुकेश हिरालाल बेनकर (फिर्यादी) यांचा रद्दीचा होलसेलचा व्यवसाय आहे. आरोपी मल्हारी देविदास गिरे यांचादेखील रद्दीचा खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. फिर्यादी व आरोपी यांच्यात सदर व्यवसायातुन ओळख व मैत्रीचे संबंध निर्माण झाल्यामुळे आरोपीने फिर्यादीस उधारीवर रद्दीचा माल देण्याची विनंती केली. फिर्यादीने आरोपीवर विश्वास ठेवून फिर्यादीने आरोपीस ७१६६ किलोचा माल रु. १२ प्रतिकिलो प्रमाणे एकूण रक्कम रु.८६,००० चा माल दिला. त्या बदल्यात आरोपीने फिर्यादीस रु.८६,००० चा धनादेश दिला. सदरचा धनादेश निश्चित वटेल अशी खात्री व भरवसा आरोपीने फिर्यादीस दिला होता. त्यानंतर फिर्यादी यांनी सदरचा चेक त्यांचे खाते असलेल्या बँकेत भरला असता सदरचा चेक खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने न वटता परत आला.

त्यामुळे फिर्यादी यांनी अॅड. राजेश दत्तात्रय कावरे व अॅड. संदिप शेळके यांचेमार्फत अहमदनगर येथीलचिफ ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट यांच्या मार्फत न्यायालयात आरोपी विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्टचे कलम १३८ अन्वये फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादीची गुणदोषावर चौकशी होवून आरोपीस धनादेश न वटल्या प्रकरणी चिफ ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट यांनी तीन महिने कारावासाची शिक्षा व दंड रु.१,३०,००० ची शिक्षा केली व शिक्षेच्या रकमेतून फिर्यादीस रु.१,२८,००० देण्याबाबत आदेश केला व रक्कम न दिल्यास तीन महिने कारावासाची शिक्षा करण्यात आला. सदर प्रकरणात फिर्यादी यांच्यावतीने अॅड. राजेश कावरे व अॅड. संदिप शेळके यांनी युक्तीवाद केला.

# धम्माल मनोरंजन

**सुविचार**



**सत्याला शपथांच्या टेकूची काही गरज नसते.**

## दिनविशेष ०२ऑक्टोबर

१९०९ : रमाबाई रानडे यांनी पुणे सेवासदन संस्थेची स्थापना केली. १९२५ : जॉन लोगी बेयर्ड यांनी पहिला दूरदर्शन संच दाखवला.१९५५ : पेरांबूर येथे इंटिग्रल कोच फॅक्टरी सुरू झाली.१९५८ : गिनीला फ्रान्सपासून स्वातंत्र्य मिळाले.१९६७ : थुरगुड मार्शल हे अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे पहिले कृष्णवर्णीय न्यायमूर्ती बनले. १९६९ : आरबीआयने महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीनिमित्त महात्मा गांधींची प्रतिमा आणि स्वाक्षरी असलेल्या २, ५, १० आणि १०० रुपयांच्या नोटा जारी केल्या. २००६ : निकेल माइन्स, पेनसिल्व्हानिया येथे चार्ल्स कार्ल रॉबर्ट्सने आमिश शाळेत पाच शाळकरी मुलींना गोळ्या घालून ठार मारले व नंतर स्वत आत्महत्या केली. जन्म :१८४७ : पॉल फॉन हिन्डेनबर्ग जर्मनीचे दुसरे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू : २ ऑगस्ट १९३४) १८६९ : मोहनदास करमचंद गांधी महात्मा गांधी यांचा पोरबंदर गुजरात येथे जन्म. १८९१ : विनायक पांडुरंग करमरकर पद्मश्री विजेते शिल्पकार यांचा जन्म. (मृत्यू : १३ जून १९६७) १९०४ : लालबहादूर शास्त्री भारतरत्न यांचा मुगलसराई उत्तरप्रदेश येथे जन्म. (मृत्यू : ११ जानेवारी १९६६) १९०८ : ङ्गगंगाधर बाळकृष्ण सरदारफ विचारवंत व साहित्यिक, पुरोगामी चळवळीचे भाष्यकार यांचा जन्म. (मृत्यू : १ डिसेंबर १९८८)१९२७ : पं. दिनकर कैकिणी शास्त्रीय गायक यांचा जन्म. (मृत्यू : २३ जानेवारी २०१०)१९३९ : बुद्धी कुंदर भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म. (मृत्यू : २३ जून २००६)१९४२ : आशा पारेख चित्रपट अभिनेत्री यांचा जन्म.१९४८ : पर्सिस खंबाटा अभिनेत्री, मॉडेल आणि लेखिका यांचा जन्म. (मृत्यू : १८ ऑगस्ट १९९८)१९६८ : याना नोव्होत्ना झेक लॉन टेनिस खेळाडू यांचा जन्म.१९७१ : कौशल इनामदार संगीतकार व गायक यांचा जन्म. मृत्यू :१९०६ : राजा रविवर्मा चित्रकार याचं निधन. (जन्म : २९ एप्रिल १८४८) १९२७ : स्वांते अऱ्हेनिअस स्वीडीश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ याचं निधन. (जन्म : १९ फेब्रुवारी १८५९)१९७५ : के. कामराज स्वातंत्र्यसैनिक, खासदार व तामिळनाडुचे मुख्यमंत्री याचं निधन. (जन्म : १५ जुलै १९०३)१९८५ : रॉक हडसन अमेरिकन अभिनेते याचं निधन. (जन्म : १७ नोव्हेंबर १९२५)

**आरोग्य**

## वेलची

एकवीस वेलदोडे घ्या. ते किडके नकोत. त्यांचे वस्त्रगाळ चूर्ण करा. या चूर्णात दोन चिमूट पिंपळीचे चूर्ण घाला. त्यानंतर सर्व चूर्ण भिजेल इतका मध घाला व सर्व एकजीव करुन एकदम गोळी करुन खा. कसल्याही प्रकारची डोकेदुखी थांबेल. हा उपाय कै. वैद्यतीर्थ आप्पाशास्त्री साठे यांनी अनुभविक गुण म्हणून सांगितलेला आहे. डोकेदुखीने त्रस्त झालेल्यांना दिलासा देणारा हा उपाय आहे. वेलची हृदयाला बळ देते. वेलचीचे दाणे आणि पिंपळमूळचे चूर्ण समभाग रोज सकाळी हृदयरोग बरा होतो.

## महाशब्दकोडे

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | ■ | ६ | ७ | |
| | ■ | | ■ | ८ | ९ | | ■ | १० | | | | ■ |
| ११ | | | | ■ | १२ | | | | ■ | १३ | | १४ |
| | ■ | | ■ | १५ | ■ | | ■ | १६ | १७ | ■ | १८ | |
| १९ | २० | ■ | २१ | | २२ | ■ | २३ | | | २४ | | ■ |
| ■ | २५ | २६ | | | | ■ | | ■ | २७ | | ■ | २८ |
| २९ | | | ■ | ३० | | | ■ | ■ | ३१ | | ■ | |
| ३२ | | | ■ | ■ | | ■ | ३३ | ३४ | | | ३५ | |
| | ■ | ३६ | ३७ | | ■ | ३८ | | | ■ | ■ | ३९ | |
| ■ | ४० | | | ■ | ४१ | ■ | ४२ | | | ४३ | ■ | |
| ४४ | ■ | ४५ | | ■ | ■ | ४६ | | | ■ | ४७ | ४८ | ■ |
| ४९ | ५० | ■ | ■ | ५१ | | | ■ | ५२ | ५३ | | | ५४ |
| ५५ | | | | | ■ | ५६ | | ■ | | ■ | ५७ | |

### आडवे संकेत

१) खपण्यासारखे, निर्वाह होण्यासारखे
४) पारधी६) मुलींचा एक खेळ
८)भार, दडपण
१०) जैन धर्मगुरु
११)दत्तक घेण्याविषयी लेखी करार
१२) इंग्रजी वर्षाचा पहिला महिना
१३) गद्य–इतिहास, चरित्र
१६) परिमल
१८) सापाची एक जात
१९) तऱ्हा, परंपरा
२१) लेखणी, बाब
२३) चंद्र २५) xxxxx डफली बजा, मेरे घुंगरु बुलाते है......
२७) xx आहो ना थोडा थांब तर २९) उन्मतपणा
३०) एका देशाचे नाव
३१) देवताविशेष
३२) मृत शरीर
३३) कमळासारखे डोळे
३६) लोक, प्रजा
३८) वयाने मोठा
३९) नंतर, पुढे
४०) गलबतावरील नोकर
४१) याचा मा करु नये
४२) चालण्याचा त्रास
४५) ओठ ४६) पोटखर्च
४७) एका हाताची ओंजळ
४९) भिती (हिं.) ५१) ढोरांचा थवा ५२) अरबी वर्षाचा चौथा महिना
५५) दगडावर नक्षीकाम करणारा
५६) झाकण ५७) सूर्य

### उभे संकेत

१) बगलेत होणारी पुटकुळी
२) त्वरित, घाईने ३) एक धुपद्रव्य
४) शिवाजी राजाचा जन्म येथे झाला
५) रुढी ६) वाईट सवय७) एक नाथ
९) तोंडात धरुन वाजविण्याचे एक साधन १४) मस्ती
१५) मुलींचा एक ड्रेस
१७) धर्मेंद्रचा एक पुत्र
२०) काटकसर, उपाय, सोय
२१) मी नाही त्यातली xx लावा आतली २२) एक देश
२३) सूर्याचा किरण
२४) नाताची पत्नी
२६) एक सिने कलावंत स्त्री
२८) बालबोध लिपि
२९) आबादी, वस्ती, (फारशी शब्द)
३३) पळ्यांचे छत
३४) उत्तम प्रतिचे चंदन
३५) मृत्यूदेवता३७) एक हिंदी चित्रपट ४३) चापट, थप्पड
४४) भार, वजन ४६) रावा ४८) एक गोड जिन्नस ५०) एक राजेशाही वाहन ५१) बेत ५३) शृंखला, पाश
५४) दही घुसळण्याचे काष्ट यंत्र

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मृ | णा | ल | कु | ळ | क | र्णी | ■ | द | र | वा | जा | ■ |
| दं | ■ | हा | ■ | ■ | ब | ■ | का | ळ | वी | ट | ■ | र |
| ग | ग | न | भ | रा | री | ■ | ■ | ण | ■ | स | त्य | म |
| ■ | व | सा | र | ■ | ■ | ■ | दे | व | त | रु | ■ | ता |
| व | स | न | ■ | प्र | ■ | ■ | वा | ळ | वी | ■ | क | रा |
| रा | णी | ■ | स | त्य | ना | रा | य | ण | ■ | ■ | र | म |
| ती | ■ | ■ | र | क्ष | क | ■ | ■ | ■ | क | प | डा | ■ |
| मा | ल | कं | स | ■ | मु | स | का | ■ | द | र | ■ | ध |
| गु | त | ■ | क | ■ | र | म | त | ग | म | त | ■ | ड |
| न | ■ | प | ट | ■ | ड | ■ | र | ■ | ■ | वा | सा | ■ |
| घो | ग | रा | ■ | च | णे | खा | वे | लो | खं | डा | चे | ■ |
| डे | ■ | गं | ध | क | ■ | स | ळ | ■ | बी | ■ | का | च |
| ■ | सु | धा | ■ | ती | ■ | र | ■ | ग | र | ग | र | णे |




१) सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून २०१० मध्ये कोणत्या चित्रपटास ऑस्कर अवार्ड मिळाला?
अ)द हर्ट लॉकर ब)लगान
क)इन ग्लोरिअस बास्टर्ड ड)तारे जमी पर

२) ३५१५३२ या संख्येतील ३ च्या नंतर येणाऱ्या ५ ची स्थानिक किंमत ही एक च्या नंतर येणाऱ्या ५ च्या स्थानिक किंमतीच्या किती पट आहे?
अ)१०० ब)१० क)१००० ड)१००००

३) महाराष्ट्रात मराठी भाषेनंतर कोणत्या भाषिकांचा क्रमांक लागतो? अ)उर्दू ब)हिंदीक)तामिळड)गुजराती

४) महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याने राज्य पातळीवर प्रथम कुटूंब नियोजन राबविले?
अ)वसंतराव नाईक ब)मोरारजी देसाई
क)शरद पवार ड) मारोतराव कन्नमवार

५)कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ कोठे आहे?
अ)वाई ब)रामटेक क)पातूर ड)संगमनेर

६) मिर्चीमध्ये तिखटपणा कशामुळे असतो?
अ)कॅरोटीन ब)क्वेर्सीटीन क)कॅप्सेसीन ड) सीट्रॉल

७) इन्फ्रारेड तापमापकाचा शोध कोणी लावला?
अ)फॅरेड ब)जेम्स वॅटसन क)टॅबर ड)स्टीफन्स बिल्टमन

८) दुग्ध व्यवसाय आणि कृषी व्यवसाय एकत्रित घेतल्यास तो कोणत्या वर्गात मोडतो?
अ)पुरक व्यवसाय ब)न्यूनता पुरक व्यवसाय
क)मिश्र व्यवसाय ड) स्पर्धात्मक व्यवसाय

९) खालीलपैकी कोणत्या तृणधान्यामध्ये सर्वात जास्त तेल असते? अ)ज्वारी ब)तांदूळ क)मका ड) गहू

१०) खालीलपैकी कोणत्या जमीनीत सर्वात जास्त सेंद्रीय पदार्थ असतात ?
अ)चिकनमाती ब)काळी माती
क)तांबडी मृदा ड) गाळाची मृदा

११) जमीनीत कायमस्वरुपी सुधारणा करण्यासाठी कोणत्या प्रकारचे कर्ज दिले जाते?
अ)दीर्घ मुदत ब)अल्प मुदत
क)मध्यम मुदतीचे ड) यापैकी नाही

१२) पश्चिम भारतातील मोठ्या शेतीला काय म्हणतात?
अ)कारभार शेती ब)गोबा शेती
क)मलबार शेती ड) यापैकी नाही

१३) ध्वनीच्या कोणत्या द्रव्यात वेग सर्वाधिक असतो?
अ)लोखंड ब)तांबे क)पाणी ड)निकेल

१४) विद्युत घटची दोन अग्रे धातुच्या तारेने जोडली असता त्या तारेमधुन वाहणाऱ्या प्रवाहास काय म्हणतात?
अ)अपघटन ब)विभवांतर
क) विद्युतधारा ड) विद्युत विचरण

१५) खालीलपैकी कोणते विद्युत रोधक आहे?
अ)लोह ब)तांबे क)रबर ड)पितळ

१६) खालीलपैकी कलीली कन म्हणजे काय ?
अ)रेणूचा गट समूह ब)कणांचा समूह
क) रेणूंचा सम्मुचय ड) रेणुंचा गट

१७) अननसाच्या गरात कोणते विकर असते?
अ)नायट्राईड ब)टायलिनक)सुक्रोज ड)ब्रोमोलिन

१८) खालीलपैकी हिमोग्लोबीनमध्ये काय असते?
अ)लसीका ब)पांढऱ्या रक्तपेशी
क)लाल रक्तपेशी ड) रक्पट्टीका

१९) फॉस्फरस पेंटॉक्साईडचा रंग कोणता असतो?
अ)पांढरा ब)निळा क)पिवळा ड) लाल

२०) कोळसा हवा विरहीत स्थितीत तापविल्यास शिल्लक राहिलेल्या भागास काय म्हणतात?
अ)कोलगॅस ब)सेल्युलोज क)नॅचरल गॅस ड)कोक

२१) स्कर्व्ही हा क जीवनसत्त्वाच्या अभावी होणारा रोग सामान्यतः कोणामध्ये आढळतो?
अ)स्त्रीया ब)वृद्ध क)अर्भक ड)प्रौढ

२२) द्रावणात अल्प प्रमाणात विरघळलेला पदार्थ खालीलपैकी काय आहे?
अ)द्रावण्य ब)द्रव क)द्राव्य ड) द्रावक

उत्तर: (१–क), (२–अ), (३–अ ), (४–अ), (५–ब), (६–क), (७–ड), (८–अ), (९–क), (१०–ब), (११–अ), (१२–क), (१३–अ), (१४–क), (१५–क), (१६–क), (१७–ड), (१८–ड), (१९– अ), (२०–ड), (२१–क), (२२–क).

## फिल्मी शब्दकोडे



| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | ■ | ३ | | | | | ४ | |
| | ■ | ■ | | ■ | ५ | | ■ | ■ | ■ | ■ | | ■ |
| | ■ | ६ | ■ | ७ | ■ | ८ | | | ९ | ■ | ■ | १० |
| ११ | | | | | १२ | ■ | ■ | ■ | १३ | | १४ | |
| | ■ | | ■ | ■ | | ■ | १५ | ■ | ■ | ■ | | ■ |
| ■ | ■ | | ■ | ■ | १६ | | | | | १७ | ■ | १८ |
| ■ | १९ | | | | | ■ | | ■ | ■ | | ■ | |
| ■ | ■ | | ■ | ■ | ■ | २० | | | ■ | २१ | २२ | |
| २३ | | ■ | २४ | ■ | ■ | ■ | | ■ | २५ | ■ | | ■ |
| | ■ | २६ | | | २७ | | | | | ■ | २८ | |
| २९ | | | ■ | ■ | | ■ | | ■ | | ■ | | ■ |
| ■ | ■ | | ■ | ■ | | ■ | ३० | ३१ | ■ | ३२ | | |
| ३३ | | | | | ■ | ■ | ■ | | ■ | ३४ | | ■ |

### आडवे संकेत

१) सन् १९९६ में बनी फिल्म हिम्मत का नायक. ३) सन् १९९१ में बनी फिल्म हिना के निर्माता निर्देशक. ५) XX और जिने की चाहत ना होती अगर तुम न होते.... ८) अभिषेक बच्चन, ह्षीता भट्ट और दारासिंह अभिनीत फिल्म. ११) सन् १९९८ में बनी फिल्म दिल तो पागल है का नायक. १३) सन् १९८७ में रवी टंडन के निर्देशन में बनी इस फिल्म में राजेश खन्ना, श्रीदेवी और स्मिता पाटील थे.
१६) सन् १९९० में निर्माता निर्देशक राकेश रोशन की इस फिल्म में अनिल कपूर का डबल रोल था. १९) सन् १९८४ में बनी फिल्म अबोध के संगीतकार.
२०) सन् १९९२ में निर्देशक के. बापय्या की इस फिल्म में ऋषी कपूर और निलम थे. २१) सन् १९९४ में महेश भट्ट के निर्देशन में बनी इस फिल्म में अतूल अग्निहोत्री और सोनाली बेंद्रे थे.
२३) ऋषी कपूर की नायीका पत्नी. (सिर्फ नाम) २६) सन् १९९० में निर्देशक वाई. नागेश्वरराव की इस फिल्म में आमिर खान और माधूरी दीक्षीत थे. २८) किम XX (नायीका) २९) तेरी XXX मेरे गीत (फिल्म) ३०) अरविंद स्वामी और मधू अभिनीत फिल्म. ३२) गोपी XXX (फिल्म) ३३) XXXXX अकेले तुम (फिल्म) ३४) सन् १९९९ में इंद्रकुमार के निर्देशन में बनी इस फिल्म में आमिर खान और मनिषा कोईराला थे.

### उभे संकेत

१) एक मशहूर हास्य कलाकार.
२) XX जय जगदीश (फिल्म)
३) XXX देव (खलनायक)
४) अमरीश XX (खलनायक)
६) सन् १९७९ में बनी फिल्म सावन को आने दो का नायक.
७) सन् १९७९ में बनी फिल्म मि. नटवरलाल की नायीका.
९) XX बदन (फिल्म) १०) सन् १९९१ में बनी फिल्म प्रहार का नायक. (सिर्फ नाम) १२) सन् १९८२ में गुलजार के निर्देशन में बनी इस फिल्म में संजीव कुमार, शर्मिला टैगोर, शबाना आझमी और वहीदा रहमान थे. १४) सन् २००२ में बनी इस फिल्म में दिनु मोरीया, बिपाशा बासू और आशुतोष राणा थे. १५) सन् १९९९ में अंदलीब सुल्तानपुरी के निर्देशन में बनी इस फिल्म में सलमान खान और उर्मिला मातोंडकर थे. १७) सन् १९९५ में डेविड धवन की इस फिल्म में ऋषी कपूर और माधूरी दीक्षीत थे. १८) मेरी XXX सुनो (फिल्म) २२) हृत्विक रोशन के नायक, निर्माता, निर्देशक पिता.
२३) XXX रॉय (सहअभिनेत्री)
२४) सन् १९९७ में निर्देशक सुनील अग्निहोत्री की इस फिल्म में अक्षय कुमार और रवीना टंडन थे.
२५) सन् १९९७ में बनी फिल्म परदेस की नायीका. (सिर्फ नाम)
२६) XXXX दुल्हनिया ले जाएंगे (फिल्म)
२७) XXX दोस्ती करोंगे (फिल्म)
३१) अजय देवगन, ट्विंकल खन्ना और अमरीश पुरी अभिनीत फिल्म.
३२) डिस्को डांसर इस फिल्म की नायीका.

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ज | य | दे | व | ग | न | ■ | बॉ | बी | दे | ओ | ल |
| ल | ■ | ■ | ■ | क्त | ■ | ज | ■ | ■ | ■ | ■ | म | ■ |
| ग | ■ | लै | ■ | ह | ■ | र | घु | वी | र | ■ | ज | ■ |
| अ | म | ला | ■ | मा | ■ | के | ■ | ज | ■ | ना | य | क |
| ल | ■ | म | ■ | रा | ■ | सा | ■ | य | म | रा | ज | ■ |
| ग | ■ | ज | ■ | है | ■ | म | न | ■ | स्त | ■ | ग | ज |
| ■ | त | नु | जा | ■ | आ | ने | ■ | आ | ■ | ■ | दी | ■ |
| ■ | क | ■ | ■ | आ | ग | ■ | ■ | ज | य | कि | श | न |
| ■ | दि | वा | ना | ■ | ले | ■ | झो | का | ■ | म | ■ | ज |
| ■ | र | ■ | गा | ■ | ल | म्हे | ■ | गुं | ■ | ■ | ■ | रा |
| दा | वा | ■ | जूं | ■ | ग | ■ | ■ | डा | ■ | आ | ई | ना |
| ■ | ला | ■ | न | ■ | जा | न | ■ | रा | ■ | ■ | ■ | ■ |
| ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | आ | ज | का | अ | जूं | न |

**विनोद**



एक नौसैनिकाने आपली रायफल हरवली. तेव्हा त्याचा अधिकारी म्हणाला, 'सैनिकाला दिलेली कोणतीही सरकारी वस्तू त्याच्या हातून हरवली किंवा फुटली तर त्याला त्याचे पैसे भरावे लागतात.'
नौसैनिक:–'अस्सं। आता माझ्या लक्षात आलं की, युद्धात जेव्हा जहाज बुडते तेव्हा त्याचा कप्तानही जहाजाबरोबर जलसमाधी का घेतो ते.'

---------------

'असं वाटतं, आपला मुलगा नक्कीच डॉक्टर होणार।'
तुम्हाला हे कसं काय कळलं।
'अहो, याचं गिचमिडीत अक्षर हेच डॉक्टरकीचं लक्षण आहे।'

**चारोळी**

परमेश्वराकडे माझं
एकच आहे मागणं
सार्थकी लागू दे माझं
इतरांसाठीचं जगणं.

# ‘डिजिटल अरेस्ट’च्या फसवणुकीपासून ज्येष्ठ नागरिकांनी विशेष सावध राहावे

## ‘सायबर सुरक्षितता’ अभियान राबविण्यात येणार; फसवणूक रोखण्यासाठी विविध उपक्रमांतून जनजागृती : पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन



नगर – आगामी सणासुदीच्या काळात ऑनलाइन व्यवहार, डिजिटल पेमेंट आणि ऑनलाइन खरेदीमध्ये वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन अहिल्यानगर जिल्ह्यात आज पासून संपूर्ण ऑक्टोबर महिन्यात ‘सायबर सुरक्षितता’ अभियान राबविण्यात येणार आहे. संपूर्ण महिनाभर नागरिकांना सायबर गुन्हे आणि ऑनलाइन आर्थिक फसवणुकीपासून सुरक्षित राहण्यासाठी विविध उपाययोजना तसेच व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. नागरिकांनी विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी सायबर सुरक्षेबाबत अधिक सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले आहे.

नवरात्रोत्सव, दसरा आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन खरेदी व डिजिटल व्यवहार वाढतात. याचा फायदा घेत सायबर गुन्हेगारांकडून आकर्षक ऑफर, बनावट वेबसाइट, फेक कस्टमर केअर, संशयास्पद लिंक, OTP, UPI तसेच गिफ्ट व्हाउचर, कॅशबॅक आणि बक्षिसांचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी अनोळखी लिंकवर क्लिक करणे किंवा संशयास्पद संदेशांना प्रतिसाद देणे टाळावे. ऑनलाइन खरेदी करताना संबंधित ई–कॉमर्स कंपनी किंवा वेबसाइट अधिकृत असल्याची खातरजमा करावी. अवास्तव सवलत किंवा अत्यल्प किमतीत वस्तू मिळण्याचे आमिष दाखविणाऱ्या लिंकपासून सावध राहावे. सोशल मीडिया, SMS, WhatsApp किंवा ई–मेलद्वारे आलेल्या संशयास्पद लिंकवरून कोणतेही पेमेंट करू नये. ऑनलाइन ऑर्डर केल्यानंतर डिलिव्हरी, कस्टम ड्युटी किंवा अन्य कारण सांगून अतिरिक्त पैसे मागितल्यास संबंधित कंपनीच्या अधिकृत माध्यमातून त्याची पडताळणी करावी. OTP, UPI PIN, ATM /डेबिट/क्रेडिट कार्ड क्रमांक, CVV, इंटरनेट बँकिंगचा पासवर्ड किंवा अन्य गोपनीय आर्थिक माहिती कोणत्याही व्यक्तीला देऊ नये.

### ‘डिजिटल अरेस्ट’च्या नावाखाली फसवणुकीचा धोका

सायबर गुन्हेगार पोलीस, CBI, ED, कस्टम, न्यायालय किंवा अन्य सरकारी यंत्रणेचे अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांना फोन किंवा व्हिडिओ कॉल करू शकतात. संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल असल्याचे, त्याच्या नावाने पार्सलमध्ये अमली पदार्थ किंवा बेकायदेशीर वस्तू आढळल्याचे किंवा बँक खाते मनी लॉन्डरिंगसाठी वापरले जात असल्याचे सांगून ‘डिजिटल अरेस्ट’ केल्याचा बनाव केला जाऊ शकतो. अशा वेळी घाबरून जाऊन कोणतेही पैसे पाठवू नयेत. पोलीस किंवा कोणतीही सरकारी यंत्रणा व्हिडिओ कॉलवर नागरिकाला ‘डिजिटल अरेस्ट’ करून तातडीने पैसे ट्रान्सफर करण्यास सांगत नाही. त्यामुळे असा कॉल आल्यास तो फसवणुकीचा प्रयत्न असू शकतो. कॉल करणाऱ्या व्यक्तीची ओळख स्वतंत्रपणे पडताळून पाहावी आणि गरज असल्यास थेट जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

### ज्येष्ठ नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी

ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करून ‘डिजिटल अरेस्ट’सह विविध प्रकारच्या सायबर फसवणुका केल्या जाऊ शकतात. त्यामुळे कुटुंबीयांनी ज्येष्ठ नागरिकांना अशा फसवणुकीच्या पद्धतींबाबत माहिती द्यावी. अनोळखी व्यक्तीचा व्हिडिओ कॉल आल्यास तो कट करावा, संबंधित पोलीस ठाणे किंवा संस्थेच्या अधिकृत क्रमांकावर स्वतःहून संपर्क साधावा आणि कुटुंबातील विश्वासू व्यक्तीशी तातडीने चर्चा करावी. ‘तुमचे खाते बंद होणार आहे’, ‘KYC अपडेट करा’, ‘तुमच्या नावावर गुन्हा दाखल आहे’, ‘तुमच्या नावाने पार्सल सापडले आहे’, ‘तुम्हाला अटक होणार आहे’ किंवा ‘पैसे सुरक्षित खात्यात ट्रान्सफर करा’ अशा धमकीवजा संदेशांवर विश्वास ठेवू नये.

### QR कोड, UPI आणि बनावट कस्टमर केअरपासून सावध

पैसे मिळण्यासाठी QR कोड स्कॅन करावा किंवा UPI PIN टाकावा लागतो, असा गैरसमज निर्माण करूनही फसवणूक केली जाते. पैसे प्राप्त करण्यासाठी QR कोड स्कॅन करणे किंवा UPI PIN टाकणे आवश्यक नसते. कोणताही व्यवहार करण्यापूर्वी प्राप्तकर्त्याचे नाव आणि रक्कम तपासावी.

बँक, विमा कंपनी, कुरिअर, ई–कॉमर्स कंपनी किंवा अन्य सेवांचा कस्टमर केअर क्रमांक शोधताना अधिकृत वेबसाइट किंवा अधिकृत ॲपचा वापर करावा. इंटरनेटवर सापडलेल्या अनोळखी क्रमांकावर संपर्क करून आर्थिक अथवा वैयक्तिक माहिती देऊ नये.

### रिमोट–ॲक्सेस ॲप डाउनलोड करू नका

तांत्रिक मदत किंवा खाते पडताळणीच्या नावाखाली सायबर गुन्हेगारांकडून मोबाईलमध्ये स्क्रीन–शेअरिंग किंवा रिमोट–ॲक्सेस ॲप डाउनलोड करण्यास सांगितले जाऊ शकते. अशा अनोळखी ॲप्सना परवानगी देऊ नये. विशेषतः बँकिंग व्यवहार सुरू असताना स्क्रीन शेअर करू नये आणि अनोळखी व्यक्तीला मोबाईलचा ताबा देऊ नये. ‘SIM बंद होणार’, ‘KYC अपडेट करा’, ‘बँक खाते गोठवले जाईल’ अशा संदेशांमधील लिंकवर क्लिक करण्यापूर्वी त्याची सत्यता तपासावी. मोबाईल क्रमांक, आधार, PAN, बँक खाते किंवा कार्डची माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये. बँक खात्यातील व्यवहारांचे SMS किंवा ॲप अलर्ट नियमितपणे तपासावेत.

मोबाईलचे ऑपरेटिंग सिस्टिम आणि आवश्यक ॲप्स अद्ययावत ठेवावेत. अनोळखी ॲप्स डाउनलोड करू नयेत तसेच त्यांना अनावश्यक परवानग्या देऊ नयेत. सार्वजनिक Wi-Fi वापरून संवेदनशील आर्थिक व्यवहार करणे शक्यतो टाळावे. सोशल मीडिया खात्यांसाठी मजबूत पासवर्ड आणि उपलब्ध असल्यास दोन–स्तरीय सुरक्षा वापरावी.

### फसवणूक झाल्यास तातडीने तक्रार करा

सायबर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच घाबरून न जाता १९३० या राष्ट्रीय सायबर क्राईम हेल्पलाइनवर तातडीने संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in या राष्ट्रीय सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर तक्रार नोंदवावी. फसवणुकीनंतर विलंब न करता तक्रार करणे महत्त्वाचे आहे. व्यवहाराची तारीख, वेळ, रक्कम, UTR/Transaction ID, मोबाईल क्रमांक, स्क्रीनशॉट, संशयास्पद लिंक, ई–मेल किंवा WhatsApp संदेश यांसारखे उपलब्ध पुरावे जतन करावेत. संशयित व्यक्तीशी पुढील कोणताही आर्थिक व्यवहार करू नये.

‘घाई करू नका, घाबरू नका, पडताळणी केल्याशिवाय पैसे देऊ नका’ हा सायबर सुरक्षेचा मूलमंत्र नागरिकांनी लक्षात ठेवावा. स्वतःबरोबरच कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि डिजिटल व्यवहाराची कमी माहिती असलेल्या व्यक्तींनाही सायबर फसवणुकीच्या पद्धतींबाबत जागरूक करावे. सण आनंदाने आणि सुरक्षितपणे साजरे करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने डिजिटल व्यवहारात आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले आहे.



## गुरुवाणी – ६७

### तीर्थंकरांना आचरणात आणा...

पक्षी आकाशात उडतात पण त्यांचा जमीनीशी संपर्क राहत नाही. आगम सांगते, जेव्हा तुम्ही सकाळी उठता तेव्हा तुमची सुरूवात कशापासून होते हे महत्त्वाचे आहे. तीर्थंकर भगवान महावीर यांनी सर्वांना

पूजा पाठ, पुजाऱ्यांपासून मुक्त केलं. जेव्हा पूजेचा स्तर वाढतो तेव्हा आचरणाचा स्तर कमी होतो. तुम्हाला आश्चर्य वाटेल की, महात्मा गांधी यांनी आयुष्यभर कधीही कोणत्या मंदिरात जाऊन पूजा केली नाही. त्यांनी राम आचरणात कसा आणता येईल यावर लक्ष केंद्रित केले. भगवान महावीर यांनीही असा धर्म दिला की सर्वसामान्य व्यक्तीला योग्य मार्ग दाखविला. तीर्थंकरांनी किती वर्षे जगायचं हे नाही शिकवले तर श्रेष्ठ जीवन जगायचे हे शिकवले. योग्य वेळ झोपणे हे महत्त्वाचे आहे. पण आजच्या काळात तुम्हाला सात आठ तास झोपणे अनिवार्य आहे, असे सांगितले जाते. तुम्हाला घाबरवले जाते. पण भगवान महावीर सांगतात, संतांनी फक्त तीन तास झोपले पाहिजे. त्यांच्याकडे दिक्षा घेताना ते प्रथम आगम शिकवत नव्हूते. तर चालणे, बसणे, उठणे, झोपणे, बोलणे, खाणे शिकवायचे. या सहा क्रियात कुठेही ध्यानाचा विषयच नव्हता. जीवन जगण्याची कला महत्वाची आहे. तीर्थंकर भगवान महावीर सांगतात, तुम्ही सहा क्रिया व्यवस्थित केल्या तर तुम्हाला पाप कर्म बंध होणार नाही. यासाठीच ’डिस्कव्हर युवर सेल्फ’ हा कार्यक्रम आहे. भगवान महावीर यांनी कायम स्व आत्माचे ध्यान करायची शिकवण दिली. भगवान महावीर, गुरूदेवांनी कधी त्यांचे चरणस्पर्श करणाऱ्यांना पश्चात्ताप करण्याची संधी दिली नाही. सुमेरू पर्वताला सूर्य प्रदक्षिणा करतो. इतका उंच आहे सुमेरू पर्वत. आपल्याला तर मच्छर प्रदक्षिणा करतो. चिखलात कमळही फुलते आणि मच्छरही जन्मतो. काय फ लवायचे हे तुम्ही ठरवता.

सूर्य ज्यांची परिक्रमा करतो ते तीर्थंकर भगवान महावीर आहेत. अशी आपली शक्ती हवी की जितके सज्जन आहेत त्यांनी आपली परिक्रमा करावी. तीर्थंकर महावीर यांची परिक्रमा करणारे कोणीही असो त्यांना कृपाप्रसादच मिळतो. तुमच्या घरात कोणाची मुलगी आली तर तिच्या आईवडिलांना वाटले पाहिजे आपल्यापेक्षा चांगले घर तिला मिळाले. अहमदनगरचे अहिल्यानगर नामकरण झाले. येथे अहिल्यादेवींचे संस्कारही आले पाहिजे. त्यानी परिवर्तन घडवले. तुम्ही सुद्धा तुमच्यातील अहिल्यादेवी जागृत करा. हे खरं जीवन आहे. सुधर्मा स्वामी कोणाला म्हणतात? ज्यांनी स्वतः विषयी एक शब्द कधी बोलला नाही. ते फक्त तीर्थंकर महावीर यांच्या विषयीच बोलतात. म्हणूनच तीर्थंकर भगवान महावीर यांच्या नंतर फक्त सुधर्मा स्वामींचे नाव घेतले जाते. तुमच्या अहंकरात सुद्धा भगवान महावीर दिसले पाहिजेत.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

## कल्याण रोडवरून मोपेडची चोरी

नगर – नगर शहरातील कल्याण रोडवरील शंभुराजे चहा नाष्टा दुकानासमोर पार्किंगमध्ये हँडल लॉक करून उभी केलेली होंडा कंपनीची व्हीएटर मोपेड (क्र. एमएच १६ डब्ल्यु २४१३)अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत प्रसाद रखमाजी भागानरे (वय ३३, रा. दिपनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची मोपेड ११ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० ते ११.३० वाजेच्या दरम्यान चोरीला गेली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## नगरमध्ये विद्यार्थ्यांच्या दप्तरातून धारदार शस्त्रे जप्त

नगर – शहरातील वाडिया पार्क परिसरातील महात्मा गांधी पुतळ्याजवळ जुन्या वादाचा राग मनात धरून काही विद्यार्थी दप्तरामध्ये धारदार शस्त्र घेऊन आल्याची धक्कादायक घटना ३० सप्टेंबर रोजी समोर आली. या घटनेची कुणकुण कोतवाली पोलिसांना वेळीच लागल्याने पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांना ताब्यात घेतल्याने संभाव्य हिंसाचाराचा मोठा प्रकार टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, वाडिया पार्क परिसरातील महात्मा गांधी पुतळ्याजवळ काही विद्यार्थी एकत्रित आले होते. त्यांच्याकडे धारदार शस्त्रे असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून संशयित विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता दप्तरांमध्ये वह्या–पुस्तकांऐवजी धारदार शस्त्रे आढळून आल्याने पोलिसही सतर्क झाले. या कारवाईत पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतल्याची माहिती पोलिसांनी दिली.

घटनास्थळावरून दोन दुचाकी तसेच धारदार शस्त्र असलेली एक बॅग पोलिसांनी जप्त केली आहे. हे शस्त्र नेमके कोणत्या उद्देशाने आणण्यात आले होते, तसेच या विद्यार्थ्यांचा पूर्वी नेमका कोणता वाद झाला होता आणि या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

कोतवालीचे पो.नि. नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. विशाल चिटणीस, पोलीस अंमलदार बाळकृष्ण दौंड, संदीप पितळे, सुरज कदम, संकेत धिवर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## जिल्ह्यातील दारू आणि जुगार अड्ड्यांवर एकाच दिवशी ४० ठिकाणी पोलिसांचे छापे



जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर छापे टाकून कारवाई केल्यानंतर जप्त मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याच्या पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ३० सप्टेंबर रोजी एकाच दिवशी दारू व जुगार अड्ड्यांवर ४० ठिकाणी छापेमारी करत एकूण २ लाख ९ हजार ३९९ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या पथकांनी राहुरी, श्रीगोंदा, नेवासा, नगर तालुका, तोफखाना, सोनई, शनिशिंगणापूर, जामखेड, पारनेर व सुपा या १० पोलीस स्टेशन हद्दीत अवैध दारू आणि जुगार चालणाऱ्या ठिकाणांची गोपनीय माहिती काढून एकाच दिवशी तब्बल ४० ठिकाणी छापे टाकून ही कारवाई केली. पथकाने केलेल्या या कारवाईमध्ये दारूबंदीचे २० गुन्हे दाखल करून १ लाख ६७ हजार ९६० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, तसेच जुगाराचे २० गुन्हे दाखल करून ४१ हजार ४३९ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन्ही प्रकार मिळून एकूण २ लाख ९ हजार ३९९ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, राहुरी पोलीस ठाणे हद्दीत दारूबंदीचा १ गुन्हा दाखल करून २ हजार ८० रुपयांचा आणि जुगाराचे ६ गुन्हे दाखल करून ९ हजार ५९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. श्रीगोंदा हद्दीत दारूबंदीचे ५ गुन्हे दाखल करून ४८ हजार ७१५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नेवासा हद्दीत दारूबंदीचे २ गुन्हे (३ हजार ४० रुपये मुद्देमाल) आणि जुगाराचे ३ गुन्हे (४ हजार ६३० रुपये मुद्देमाल) दाखल झाले. नगर तालुका हद्दीत दारूबंदीचे ३ गुन्हे दाखल करून ३५ हजार ८४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तोफखाना हद्दीत दारूबंदीचे २ गुन्हे दाखल करून ६० हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच सोनई हद्दीत दारूबंदीचा १ गुन्हा (३ हजार ५०० रुपये मुद्देमाल) व जुगाराचे २ गुन्हे (२ हजार ४९० रुपये मुद्देमाल), शनिशिंगणापूर हद्दीत दारूबंदीचा १ गुन्हा (३ हजार रुपये मुद्देमाल) व जुगाराचा १ गुन्हा (१ हजार ४४० रुपये मुद्देमाल), जामखेड हद्दीत दारूबंदीचे २ गुन्हे (२ हजार ४०० रुपये मुद्देमाल) व जुगाराचे ५ गुन्हे (२० हजार ४४९ रुपये मुद्देमाल), पारनेर हद्दीत दारूबंदीचे २ गुन्हे (७ हजार ५२० रुपये मुद्देमाल) व जुगाराचे २ गुन्हे (१ हजार ८७० रुपये मुद्देमाल), तर सुपा पोलीस ठाणे हद्दीत दारूबंदीचा १ गुन्हा (९६० रुपये मुद्देमाल) आणि जुगाराचा १ गुन्हा (९७० रुपये मुद्देमाल) दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व पोलीस अंमलदार विजय पवार, रमीरराजा आत्तार, अजिनाथ पाखरे, अभिजीत अरकल, अमोल कोतकर, मनोज साखरे, बाळासाहेब नागरगोजे, निळकंठ कारखेले, सतीष भवर, शाहीद शेख, संदिप पवार, विजय ठोंबरे, संतोष खैरे, सागर ससाणे, रोहित येमुल, अशोक लिपणे, किशोर शिरसाठ, अरूण गांगुर्डे, रोहित मिसाळ, दिपक जाधव, विष्णु भागवत, अमोल आजबे व प्रकाश मांडगे यांच्या ७ पथकांनी केली आहे.



माळीवाडा परिसरातून फुलाच्या दुकानातून महिलेची पर्स चोरणाऱ्या आरोपींना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

## माळीवाड्यातून महिलेची पर्स चोरणारे ३ आरोपी जेरबंद

नगर – नगर शहरातील माळीवाडा परिसरात भरदिवसा फुलविक्री करणाऱ्या महिलेची ३० हजार रुपयांची रोकड असलेली पर्स चोरून पसार झालेल्या तीन संशयित आरोपींना कोतवाली पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत शोध घेऊन ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्ह्यात वापरलेली मोपेड गाडी व चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

माळीवाडा येथील श्री विशाल गणपती मंदिरा जवळील श्री दत्त फ्लॉवर डेकोरेटर दुकानाजवळून एका अज्ञात इसमाने अलका दत्तात्रय भुतारे यांची रोख ३० हजार रुपये असलेली पर्स २८ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास चोरून नेली होती. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी गुन्हे शोध पथकाला आरोपींचा लवकरात लवकर शोध घेण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार कोतवालीच्या गुन्हे शोध पथकाने घटनास्थळाची पाहणी करून गुप्त माहितीदारामार्फत आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे कसून तपास केला. या तपासात सदर चोरी करणारा इसम व त्याचे इतर दोन साथीदार एका सुझुकी क्सेस मोपेड गाडीवरून (क्र. एमएच १६ डीक्यू ९६८९) पर्स चोरून पळून गेल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी अवघ्या चोवीस तासांच्या आत कारवाई करत तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. चौकशी दरम्यान त्यांनी आपले नाव निखिल सुनील उल्हारे (वय १९), अनिकेत गोवर्धन पवार (वय २०) आणि यशोदास राजु शिंदे (वय २२, सर्व रा. देवी मंदिराच्या मागे, रामवाडी, अहिल्यानगर) असल्याचे सांगितले. तसेच त्यांनीच हा गुन्हा केल्याची कबुली दिली असून, त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेली पर्स, ३० हजार रुपयांची रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली सुझुकी क्सेस मोपेड गाडी असा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस अंमलदार वर्षा पंडित करत आहेत.

ही कारवाई पोलीस अंमलदार विशाल दळवी, विनोद बोरगे, सुर्यकांत डाके, राहुल शिंदे, वर्षा पंडित, सुरज कदम, संकेत धिवर, अतुल लाटे, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, सचिन लोळगे, रमेश शिंदे, वैभव काळे, संदीप शेंडगे, राहुल गुंडू, अरुण सांगळे आदींच्या पथकाने केली आहे.

## भिंगारच्या शुक्रवार बाजारात दुकानात चोरी; गुन्हा दाखल

नगर – भिंगार शहरातील शुक्रवार बाजार परिसरातील एका चपलेच्या दुकानात अज्ञात चोरट्याने कुलूप व कडी–कोंडा तोडून प्रवेश करत सुमारे ८ हजार रुपये किमतीचे विविध प्रकारच्या चपला, सँडल आणि बुटांचा साठा लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शेनाज सईद बेग (वय ४४, रा. घर नं. ३५०, सदर बाजार, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या भिंगारमधील शुक्रवार बाजार येथील दुकानाचे कुलूप व कडी–कोंडा अज्ञात चोरट्याने २९ सप्टेंबर रोजी रात्री ९.३० वाजण्यापासून ते ३० सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० दरम्यान तोडला. चोरट्याने दुकानातील विविध कंपन्यांच्या चपला, सँडल आणि बूट असा अंदाजे ८ हजार रुपये किमतीचा माल चोरून नेला. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस अंमलदार गारुडकर करत आहेत.

## नवीन रेल्वे मालधक्क्यावर माथाडी कामगार काम करण्यास तयार; ‘मूलभूत सुविधा व नवीन मजुरी दर’ निश्चित करावे : अविनाश घुले

नगर – नवीन रेल्वे मालधक्क्यावर माथाडी कामगारांना काम करण्यास कोणतीही हरकत नसून, तेथील आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच नवीन मजुरीचे दर निश्चित करून नवीन करारनामा करण्यात यावा, अशी मागणी अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हा माथाडी कृती आराखडा समितीची तत्काळ बैठक घेऊन कामगार, हुंडेकरी व रेल्वे प्रशासनाच्या उपस्थितीत योग्य निर्णय घेण्याची मागणीही करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना निवेदन देताना अविनाश घुले समवेत सचिव संजय महापुरे, प्रशांत गायकवाड आदी उपस्थित होते

अहिल्यानगर माथाडी मंडळाने १९ ऑगस्ट २०२६ रोजी हुंडेकरी व वाहतूक संघटनांना पत्र देऊन माथाडी कामगार नवीन मालधक्क्यावर काम करण्यास तयार नसल्याचे कळविले होते. ही बाब मुकादम यांच्या निदर्शनास आल्यानंतर अहमदनगर माथाडी मंडळाच्या अध्यक्षांशी चर्चा करण्यात आली. त्यावेळी माथाडी कामगार नवीन मालधक्क्यावर आलेला माल वॅगनमधून काढून थेट ट्रकमध्ये भरण्यास तयार असल्याचे मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.



त्यानंतर माथाडी मंडळाने २१ सप्टेंबर २०२६ रोजी सुधारित पत्र काढून माथाडी कामगार नवीन मालधक्क्यावर वॅगनमधून माल काढून थेट ट्रकमध्ये भरण्यास तयार असल्याचे संबंधितांना कळविले आहे. त्यामुळे कामगारांची नवीन मालधक्क्यावर काम करण्याची भूमिका स्पष्ट झाली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, १ एप्रिल २०२४ रोजी माथाडी कामगार, मुकादम व हुंडेकरी यांच्यात झालेला करारनामा हा अहमदनगर येथील जुन्या रेल्वे मालधक्क्यापुरता मर्यादित आहे. त्यामुळे नवीन रेल्वे मालधक्क्यावर काम करण्यासाठी नवीन मजुरीचे दर निश्चित करून स्वतंत्र नवीन करारनामा करण्याचे आदेश संबंधितांना द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. नवीन मालधक्क्यावर प्रचलित करारनाम्यातील तरतुदीनुसार हायलेव्हल प्लॅटफॉर्म, निवारा शेड तसेच कामगार कायद्यानुसार आवश्यक असलेल्या सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यास माथाडी कामगार काम करण्यास तयार असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

नवीन मालधक्क्यावर मागील एक महिन्यापासून बंद असलेले काम तातडीने सुरू करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा माथाडी कृती आराखडा समितीची अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली तातडीने बैठक आयोजित करावी. या बैठकीस कामगार प्रतिनिधी, हुंडेकरी आणि रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना पाचारण करून सर्व संबंधितांशी चर्चा करून तोडगा काढावा, अशी विनंती अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतने केली आहे.

या निवेदनासोबत २६ एप्रिल २०२४ रोजीचा करारनामा तसेच माथाडी मंडळाचे १९ ऑगस्ट २०२६ आणि २१ सप्टेंबर २०२६ रोजीचे पत्र जोडण्यात आले आहे.

